नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १७४ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी 10 ते दुपारी 1 व संध्याकाळी 5 ते 8
उपलब्ध उपचार
रूट कॅनाल ट्रीटमेंट
हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
दातांचे सौंदर्यवर्धक उपचार (फिलिंग, क्राउन, ब्रिज)
दंत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया (डेंटल इम्प्लांट)
लहान मुलांच्या दंतरोगावरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
फोन : (02425) 222383
अनुभवी व तज्ञ डॉक्टर | आधुनिक उपकरणे व स्वच्छ, सुरक्षित वातावरण | वाजवी खर्चात उत्तम उपचार | आपल्या हास्याची आमची काळजी

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026


दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासून २००० के व्ही ए
जनरेटर विक्री | दुरुस्ती व देखभाल | तज्ज्ञ तंत्रज्ञ | विश्वासाई सेवा वेळेत काम
संपर्क
+91-8286562340 / 9004511593
8652653990 / 8286562350
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053, Sector - 5 Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com | Website: www.adarshengineering.net

शनिवार, दि. ३० मे २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

राष्ट्रीय अध्यक्ष

मा.श्री.अशोकराव वानखेडे

नुतन प्रदेश अध्यक्ष

मा.श्री.निलेश सोमणी

सोशल मिडीया प्रदेश अध्यक्ष

श्री.सिध्दार्थ भोकरे

प्रदेश संपर्क प्रमुख

मा.श्री.वैभव स्वामी

संस्थापक अध्यक्ष

मा. श्री. संजयजी भोकरे (साहेब)

इलेक्ट्रॉनिक मिडीया प्रदेश अध्यक्ष

श्री.अतुल परदेशी

प्रदेश प्रसिद्धी प्रमुख

मा.श्री.नवनाथ जाधव

आरोग्य सेल प्रदेश अध्यक्ष

मा.श्री.अमितकुमार खाडे

पत्रकार हल्ला विरोधी समिती प्रदेश अध्यक्ष

मा.श्री.किशोर पाटील


श्री.रमजान मन्सुरी
गुजरात प्रदेश अध्यक्ष


श्री.मनिष महाजन
मध्यप्रदेश अध्यक्ष


राजश्री चौधरी
दिल्ली प्रदेश अध्यक्ष

प्रवक्ते

मा.श्री.रमेश डोंगरे

सांस्कृतिक विभाग अध्यक्ष प्रदेश अध्यक्ष

श्री.संदिप भटेवरा

कायदेविषयक सल्लागार

ॲड.रचना भालके

प्रदेश सहसंपर्क प्रमुख

श्री.कुंदन पाटील


श्री.आबा खवणेकर
गोवा प्रदेश संपर्क प्रमुख


श्री.रघुनाथ सोनवणे
दिल्ली प्रदेश संपर्क प्रमुख

संकल्प असावेत
नवे तुमचे मिळाव्यात
त्यांना नव्या दिशा
प्रत्येक स्वप्न पूर्ण
व्हावे तुझेह्याच
वाढदिवसाच्या
शुभेच्छा:!





## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ; मुंबई

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश प्रसिद्धी प्रमुख तथा दै. स. गांवकरीचे कार्यकारी संपादक

मा. श्री.

# नवनाथ जाधव

आपणांस वाढदिवसाच्या

# हार्दिक शुभेच्छा...!

## प्रदेश कार्यकारिणी सदस्य/ विभागीय अध्यक्ष

सौ.सुरेखा खानोरे (सचिव), श्री.अशोक देडे (प्रदेश उपाध्यक्ष), श्री.अभयकुमार दांडगे (प्रदेश उपाध्यक्ष),श्री.महेश पानसे (प्रदेश उपाध्यक्ष),
श्री.किशोर रायसाकडा (प्रदेश उपाध्यक्ष), श्री.नितीन म.शिंदे (प्रदेश उपाध्यक्ष), पराग कुंकुलोळ (प्रदेश सहसंपर्कप्रमुख)
श्री.नितीन जाधव (मंत्रालय संपर्क प्रमुख),श्री.सोमनाथ देशकर (प्रदेश निवड समिती प्रमुख), नितीन शिंदे (पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष),
श्री.नयन मोंढे (विदर्भ प्रमुख), श्री.सुनील फुलारी (अमरावती विभाग अध्यक्ष), श्री.शैलेश पालकर (कोकण विभागीय अध्यक्ष),
श्री.अनिल सावंत (मराठवाडा विभागीय अध्यक्ष), श्री.अनुपकुमार भार्गव (नागपूर विदर्भ प्रमुख),
श्री.भुवनेश दुसाने (उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष),

**प्रदेश कार्यकारिणी सदस्य :**

श्री.प्रशांत कांबळे (मुंबई), श्री.सुरेश खोसे (अहिल्यानगर), श्री.स्वामीराज गायकवाड (सोलापूर), श्री.संग्राम मोरे (नांदेड),
श्री.स्वामी शिरकुल (मुंबई), श्री.सुभाष विसे (ठाणे), श्री.बाजीराव फराकटे (कोल्हापूर),
श्री.अनिल रहाणे (अहिल्यानगर), कु.श्रध्दा ठोंबरे (बदलापूर), श्री.पराग कुंकूलोळ (पिंपरी चिंचवड),
श्री.लक्ष्मण डोळस (नाशिक), श्री.सिताराम गावडे (सिंधूदूर्ग), श्री.अरूण लोखंडे (तुळजापूर),
श्री.शरद नागदेवे (नागपूर), श्री.रुपेश पाडमुख (नांदेड), प्रभू गोरे,
श्री.सुभाष डोके (प्रदेश का. सदस्य), श्री.राजेंद्र कोर्टे पाटील (पंढरपूर),
श्री.कुंडलिक वाळेकर (औरंगाबाद),श्री.रवींद्र गुरव (नंदुरबार), श्री.अबरार मिर्झा (जळगाव),
श्री.संतोष खालकर (सातारा), श्री.पंकज सोनवणे (वाशिम), प्रा.जसपाल सिंह सिसोदिया (धुळे),
श्री.संजोग काळदंते (पश्चिम महाराष्ट्र सचिव), श्री.नाविद अहमद (हिंगोली), विकास कदम (सातारा)

संघटनेचे सर्व जिल्हा पदाधिकारी, तालुकाध्यक्ष व सभासद



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ; मुंबई

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ; मुंबई

: शुभेच्छुक :
**डॉ. श्री. विश्वासराव आरोटे**
प्रदेश सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई
प्रदेश सरचिटणीस महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई
संपादक : दैनिक समर्थ गांवकरी वृत्तपत्र समुह, महाराष्ट्र

# थोडक्यात पण महत्वाचे



## उन्हाळी बाजरी मळणीत शेतकरी व्यस्त

खोडद (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यात अवकाळी पावसानंतर हवामानात सुधारणा होताच उन्हाळी बाजरी मळणीच्या कामांना वेग आला असून शेतकरी मशीन मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर धावपळ करत आहे. तालुक्यात उन्हाळी बाजरी लागवडीकडे शेतकऱ्यांचा वाढता कल दिसून येते आहे.साधारण तीन ते सव्वा तीन महिन्यांत हे पीक पूर्णपणे तयार होते. कणसामध्ये दाणे भरल्यानंतर गेल्या पंधरा दिवसांपासून बाजरी काढण्याची कामे सुरू होती. मात्र, तीन दिवसांपूर्वीझालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी चिंतेत पडले होते. काढून ठेवलेली बाजरी भिजण्याची भीती निर्माण झाल्याने अनेकांनी कामे थांबवली होती.आता पाऊस उघडल्यानंतर शेतकरी पुन्हा जोमाने मळणीकडे वळले आहेत. उन्हाळी बाजरी मशिनद्वारे तयार करण्यासाठी सध्या शंभर किलोमागे सुमारे २०० रुपये दर आकारला जात असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. मात्र, मशीन वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अनेकांना प्रतिक्षा करावी लागत आहे. हवामान खात्याकडून पुन्हा पावसाचा अंदाज व्यक्त होत असल्याने शेतकरी दिवसभर मशीनची वाट पाहत असून वेळ मिळाल्यास रात्री उशिरापर्यंत शेतात मळणीचे काम सुरू ठेवत आहेत.पिक सुरक्षित घरात आणण्यासाठी सध्या शेतकऱ्यांची मोठी धावपळ सुरू आहे.

## कर्तव्यावर असलेल्या शिक्षिकेवर काळाचा घाला



खोडद (स. गांवकरी) : जनगणनेला जाताना कान्हेफाटा, ता.मावळ येथील भीषण अपघातात शिक्षक भगिनी दीपाली सुजित तांबे यांचे आज दुर्दैवी निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली सध्या संपूर्ण देशभरात अत्यंत महत्त्वाची अशी जनगणनेची मोहीम अत्यंत वेगाने राबवली जात आहे. या राष्ट्रीय पातळीवरील अतिशय महत्त्वपूर्ण कार्यात अनेक सरकारी कर्मचारी आणि विशेषतः शिक्षक वर्ग अत्यंत मोलाची आणि महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. मात्र हेच राष्ट्रीय कर्तव्य अत्यंत निष्ठेने बजावण्यासाठी जाणाऱ्या एका महिला शिक्षिका तसेच जनगणना प्रगणक दीपाली सुजित तांबे यांच्यावर अतिशय दुर्दैवी आणि अकल्पित वेळ ओढवली आहे. पुणे जिल्ह्यातील मावळ परिसरामध्ये घडलेल्या एका अत्यंत भीषण आणि दुर्दैवी रस्ते अपघातात या कर्तव्यदक्ष शिक्षिकेचा जागीच मृत्यू झाला आहे. या हृदयद्रावक आणि मन हेलावून टाकणाऱ्या घटनेमुळे संपूर्ण शैक्षणिक वर्तुळात तसेच पुणे जिल्ह्यात शोक व्यक्त केला जात आहे. त्या मूळच्या आंबेगाव तालुक्यातील मंचर येथील रहिवासी होत्या. मात्र नोकरी आणि कुटुंबाच्या सोयीसाठी सध्या त्या पुणे नजीकच्या चिंचवड भागातील तानाजीनगर येथे वास्तव्यास होत्या. दीपाली सुजित तांबे या मावळ तालुक्यातील अहिरवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे ज्ञानदानाचे पवित्र कार्य अतिशय प्रामाणिकपणे करत होत्या. लहान विद्यार्थ्यांना घडवण्याच्या महत्त्वाच्या कामासोबतच त्यांच्यावर देशाच्या जनगणनेची अतिशय मोठी आणि महत्त्वाची प्रशासकीय जबाबदारी पार पाडत होत्या. देशाच्या प्रगतीत आणि प्रशासकीय कामांमध्ये शिक्षकांचे योगदान नेहमीच महत्त्वपूर्ण राहिले आहे. अशा प्रकारच्या प्रशासकीय मोहिमांमध्ये सहभागी असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेकडे आणि विशेषतः महामार्गांवरील वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने अधिक कडक आणि प्रभावी उपाययोजना राबवणे तसेच नागरिकांनी देखील सुरक्षेच्या बाबतीत जागरूक राहणे, ही आता काळाची गरज बनली आहे.

## कोट्यवधींचा खर्च करूनही सापुतारा बसस्थानक सुविधांविना



डांग, गुजरात (स. गांवकरी) : गुजरातमधील एकमेव प्रसिद्ध पर्यटक स्थळ सापुतारा येथे पर्यटन विकासाचे मोठमोठे दावे केले जात असताना प्रवाशांच्या गैरसोयीचा गंभीर प्रकार समोर आला आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च करून आधुनिक सुविधांनी सुसज्ज बसस्थानक उभारण्यात आले असले, तरी ते पर्यटकांसाठी सुविधेपेक्षा अडचणीचे केंद्र बनल्याचे आरोप होत आहेत. विशेषतः लांब पल्ल्याच्या एस.टी. बसने प्रवास करून येणाऱ्या प्रवाशांना चहा-नाश्ता, शुद्ध पिण्याचे पाणी तसेच आरामासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे पर्यटनस्थळाच्या प्रतिमेलाही धक्का बसत असल्याची भावना व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिक आणि पर्यटकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून बसस्थानक परिसरातील कॅन्टीन दीर्घकाळापासून बंद अवस्थेत धूळ खात पडले असल्याची चर्चा आहे. मात्र, याबाबत एस.टी. विभाग मौन बाळगून असल्याचा आरोप होत आहे. कॅन्टीन बंद असल्याने एका बाजूला एस.टी. महामंडळ स्वतःच्या हक्काच्या उत्पन्नापासून वंचित राहत आहे, तर दुसऱ्या बाजूला प्रवासी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना पिण्याचे पाणी व अल्पोपहारासाठी बसस्थानकाबाहेर भटकंती करावी लागत आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही पर्यटकांना मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवण्यात येत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. सध्या नागरिकांमध्ये असा सवाल उपस्थित केला जात आहे की, प्रशासन प्रवाशांच्या हिताऐवजी नेमके कोणाच्या हिताला प्राधान्य देत आहे? पर्यटनस्थळ सापुताराच्या प्रतिष्ठेला साजेशा बसस्थानक व्यवस्थांची तातडीने दुरुस्ती करून बंद पडलेले कॅन्टीन सुरू करण्यात यावे तसेच प्रवाशांना शुद्ध पाणी, चहा-नाश्ता यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिक आणि पर्यटकांकडून करण्यात येत आहे.

## प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

प्रवरानगर (लोणी) (स. गांवकरी) : ज्ञान, संस्कार आणि गुणवत्तेची उज्वल परंपरा जपणाऱ्या लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, प्रवरानगर आयोजित इयत्ता १० वी व १२ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभास उपस्थित राहिलो. यावेळी उल्लेखनीय शैक्षणिक यश संपादन करून संस्थेचे, पालकांचे आणि संपूर्ण परिसराचे नाव उज्वल करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करत त्यांच्या जिद्द, मेहनत, चिकाटी आणि कर्तृत्वाचे कौतुक केले. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताकरीता स्थापन केलेल्या संस्थेचा लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी विस्तार केला. काळानूरूप शैक्षणिक क्षेत्रातील बदल स्वीकारून संस्थेने केलेल्या प्रगतीचे यश गुणवंत विद्यार्थ्यांच्या दैदिप्यमान यशातून अधोरेखित झाले आहे. संस्थेने विद्यार्थ्यासाठी कौशल्य प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची सुविधा निर्माण करून दिली आहे. प्रवरा शैक्षणिक संस्थेचा गुवणतेचा पॅटर्न महत्वपूर्ण ठरत असल्याचे समाधान यानिमित्ताने व्यक्त केले.

# खा. स्व. निवृत्तीशेठ शेरकर यांचा स्मृतिदिन विविध कार्यक्रमांनी संपन्न

खोडद : (स. गांवकरी)

श्री विघ्नह साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन माजी खासदार स्व.निवृत्तीशेठ नामदेव शेरकर व स्व.हिराबाई निवृत्तीशेठ शेरकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्शगाव पाटोदा येथील मा. सरपंच मा.श्री.भास्करराव पेरे पाटील हे या कार्यक्रमास उपस्थित होते.समाजाची सेवा करत असताना स्व. निवृत्तीशेठ शेरकर यांनी जुन्नर व आंबेगाव तालुक्यातील लोकांसाठी श्री विघ्नहर साखर कारखान्याची उभारणी करुन दोन्ही तालुक्यातील शेतकरी वर्गाचे आर्थिक जिवनमान उंचावण्याचे मोठे कार्य केले आहे. स्व. निवृत्तीशेठ शेरकर (शेठबाबा) यांच्यासारखे पारदर्शक, शेतकरी हिताचे निर्णय घेणारे आणि दूरदृष्टी असलेले आदर्श सरपंच आजच्या काळात होणे ही काळाची गरज आहे. त्यांच्यासारख्या नेतृत्वामुळेच ग्रामीण भागाचा शाश्वत विकास, सहकार्याची भावना आणि गावाचा सर्वांगीण विकास शक्य झाला. तसेच स्व.निवृत्तीशेठ शेरकर यांना त्यांच्या पत्नी हिराबाई शेरकर यांनी खंबीरसाथ दिली.



स्व.निवृत्तीशेठ शेरकर यांनी स्थापन केलेल्या विघ्नहर सहकारी कारखान्याचा कारभार विद्यमान चेअरमन सत्यशिल शेरकर हे अगदी पारदर्शकपणे सांभाळत आहे. शेठबाबा यांनी दिलेल्या दिशेने तुम्ही चालला आहात.त्याच प्रमाणे त्यांचे नावाच निवृत्ती असल्याने ते नावाप्रमाणे निस्वार्थी होते .स्व. निवृत्तीशेठ यांच्या सारखी निस्वार्थी व धेयवेडी माणसे यापुढील काळात होणार नाहीत. असे गौरोद्‌गार भास्करराव पेरे पाटील यांनी काढले.

जुन्नर तालुक्याचे भाग्यविधाते व श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार स्व. निवृत्तीशेठ शेरकर यांचे १९ वे व त्यांच्या पत्नी स्व. हिराबाई शेरकर यांच्या १७ वे पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित अभिवादन सभेत प्रमुख पाहुणे म्हणून भास्करराव पेरे पाटील बोलत होते.

> प्रास्ताविक करताना चेअरमन सत्यशिल शेरकर म्हणाले की, स्व. शेठबाबांची स्मृती कायम स्मरणात रहावी या उद्देशाने दरवर्षी पुण्यस्मरण कार्यक्रमांचे आयोजन केले जात असून दरवर्षी मोठ्या संख्येने उपस्थित रहात असलेल्या सर्वांचे स्वागत केले. सत्यशिल शेरकर पुढे म्हणाले की, स्व. शेठबाबांनी घालून दिलेल्या आदर्श नुसार विघ्नहरचा कारभार पारदर्शकपणे केला जात असून शेतकरी हिताचे निर्णय घेतले जात आहेत.

पुढे त्यांनी गावच्या सरपंचांना किती अधिकार असतात आणि गावचा सरपंच कोणकोणती कामे करु शकतो याबाबत सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. तसेच पर्यावरण संतुलनासाठी गावात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करावी, गाव स्वच्छ ठेवावे, गावातील वडीलधाऱ्या माणसांना सन्मानाने वागवावे, मुलांना चांगले शिक्षण आणि संस्कार द्यावेत.त्याच प्रमाणे त्यांनी स्वताच्या गावामध्ये त्यांच्या सरपंचपदाच्या काळात फिल्टर पाणी, मोफत दळण, मोफत गरम पाणी, गावात वायफाय इ. सुविधा मोफत व सवलतीच्या दरात ग्रामपंचायत मार्फत शेती मशागतीसाठी गावकऱ्यांना ट्रॅक्टर उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्याप्रमाणे इतरही सरपंचांनी आपापल्या गावात अशा सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले.

यावेळी आमदार शरददादा सोनवणे, व्हाईस चेअरमन अशोक घोलप, संजय काळे, अनिल मेहर, तानाजी बेनके ,नंदूकाका शेरकर ,सुमित्रा शेरकर, आशा बुचके ,माऊली खंडागळे, रघुनाथ लेंडे ,पांडुरंग पवार, अंकुश आमले, अनंतराव चौगुले, शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आदी मान्यवरांसह श्री विघ्नहर कारखान्याचे सर्व आजी-माजी संचालक विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, शिरोली पंचक्रोशीतील ग्रामस्थ, विविध गांवांचे सरपंच, उपसरपंच, अनेक संस्थांचे चेअरमन /संचालक, सत्यशिल शेरकर यांचा मित्र परिवार, कारखान्याचे सर्व अधिकारी आणि कामगार वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार शेरकर कुटूंबीयांच्या वतीने करण्यात आला.

याप्रसंगी आशा बुचके, आमदार शरद सोनवणे ,संजय काळे यांनीही स्व. निवृत्ती शेठ शेरकर यांच्या आठवणींना उजाळा देऊन त्यांना आदरांजली वाहिली.

# स्पोर्ट्स दुकानांवर छापा ; २.३४ लाखांचा माल जप्त

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शहरातील बालिकाश्रम रस्ता परिसरातील दोन स्पोर्ट्स दुकानांवर तोफखाना पोलिसांनी मंगळवारी (२६ मे) टाकलेल्या संयुक्त छाप्यात नामांकित ‘पुमा’ कंपनीच्या नावाने विक्रीस ठेवलेला तब्बल २ लाख ३४ हजार ४५० रूपयांचा बनावट माल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे शहरातील बनावट ब्रँडेड वस्तूंच्या विक्रीचा मोठा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी ‘पुमा-से’ लिमिटेड कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी महेंद्र सोहनसिंग देवरा (रा. राजस्थान) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार कॉपीराईट अ‍ॅक्ट कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुमा कंपनीचे बनावट ट्रॅक पॅन्ट, टी-शर्ट, जॅकेट, मोजे, टोपी आणि बनावट टॅग मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याची माहिती कंपनीच्या प्रतिनिधींना मिळाली होती. त्यानंतर कंपनीचे प्रतिनिधी




महेंद्र देवरा व फिल्ड एक्झिक्युटिव्ह साजिद अन्सारी यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे पोलीस मदतीची मागणी केली होती. त्यानुसार तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक परशुराम दळवी यांच्या पथकाने छापा टाकला. शिव स्पोर्ट्स अँड शू मॉल येथे करण्यात आली. दुकानात पुमा कंपनीच्या नावाने बनावट ट्रॅक पॅन्ट, टी-शर्ट, जॅकेट व मोजे विक्रीस ठेवलेले आढळले. पोलिसांनी पंचासमक्ष तपासणी केली असता एकूण एक लाख ९० हजार ८५० रूपयांचा बनावट माल जप्त करण्यात आला.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील ८७० ग्रामपंचायतींच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर; १२ जूनला विशेष ग्रामसभा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपलेल्या जिल्ह्यातील ८७० ग्रामपंचायतींच्या प्रभागनिहाय आरक्षण सोडतीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. त्यानुसार १२ जून २०२६ पर्यंत ८७० ग्रामपंचायतींच्या आरक्षण सोडतीसाठी विशेष ग्रामसभा आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. १० जुलै रोजी प्रभागनिहाय अंतिम आरक्षण प्रसिद्ध होणार आहे.

२०२४ व २०२५ या दोन वर्षांत मुदत संपलेल्या १०० ग्रामपंचायतींची आरक्षण सोडत यापूर्वीच झालेली असताना राज्य निवडणूक आयोगाने पुन्हा आरक्षण सोडत घेण्याचे निर्देश दिले आहेत. गेल्या काही महिन्यांपूर्वी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ७७० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक




निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने प्रभागरचना कार्यक्रम हाती घेऊन तो अंतिम केला होता. आता ७७० ग्रामपंचायतींबरोबरच गेल्या दोन वर्षांतील १०० अशा एकूण ८७० ग्रामपंचायतींच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे.

त्यानुसार १२ जून २०२६ रोजी ८७० गावांत आरक्षण सोडतीसाठी विशेष ग्रामसभा होणार आहे. त्यानंतर ग्रामपंचायतनिहाय आरक्षण सोडतीचे प्रारूप १९ जून रोजी प्रसिद्ध केले जाणार आहे. या प्रारूप आरक्षणावर २५ जूनपर्यंत हरकती व सूचना मागवल्या जाणार आहेत. प्राप्त हरकतींवर प्रांताधिकारी सुनावणी घेणार आहेत. त्यानंतर जिल्हाधिकारी ८ जुलैपर्यंत अधिसूचनेस मान्यता देणार असून, त्यांच्या मान्यतेनंतर १० जुलै २०२६ रोजी ८७० ग्रामपंचायतींचे प्रभागनिहाय अंतिम आरक्षण प्रसिद्ध होणार आहे.

अकोले ५२, संगमनेर ९४, कोपरगाव २९, श्रीरामपूर २७, राहाता २५, राहुरी ४४, नेवासा ५९, नगर ६०, पारनेर ८८, पाथर्डी ७९, शेवगाव ४८, कर्जत ५५, जामखेड ४९, श्रीगोंदा ६२ अशा एकूण ८७० ग्रामपंचायतींचा यामध्ये समावेश आहे.

# पुण्यातील कुख्यात ‘कोयता गँग’ नगरमध्ये जेरबंद

**४ गावठी कट्टे, १० काडतुसे, २.७६ लाखांचा मुद्देमाल जप्त**

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पुणे येथील कुख्यात आदेकर टोळीतील ‘कोयता गँग’चे सदस्य दरोड्याच्या तयारीत असताना अहिल्यानगर जिल्ह्यात जेरबंद झाले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत आरोपींकडून ४ गावठी कट्टे, १० जिवंत काडतुसे, कोयता, चाकू असा एकूण २ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दि. २६ मे २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना मिलिट्री इंटेलिजेन्स, साउथ कमांड, अहिल्यानगर यांच्याकडून इनपुट मिळाले. मिरावली पहाडाच्या पायथ्याजवळ, बुऱ्हानगर रोड, भिंगार येथे काही इसम अग्निशस्त्रासह दरोडा घालण्याच्या तयारीत थांबले असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक कबाडी यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि





अनंत सालगुडे, राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार गणेश धोत्रे, सुनील पवार, विष्णू भागवत, शाहिद शेख, प्रकाश मांडगे, बाळासाहेब गुंजाळ, प्रशांत राठोड यांचे पथक तात्काळ रवाना झाले. पथकाने घटनास्थळी जाऊन खात्री केली असता ५ इसम संशयितरित्या उभे असल्याचे दिसले. पोलिसांना पाहताच एक इसम मोटारसायकलवरून पळून गेला. पथकाने उर्वरित ४ जणांना पाठलाग करून ताब्यात घेतले. ताब्यातील आरोपींनी आपली नावे २) मुस्ताक ईब्राहिम शेख (वय २२, रा. कोंढवा, आश्रमनगर, पुणे) , २) विराट उर्फ विल्यम रविंद्र मेहंदळे (वय २६, रा. काकडे वस्ती, कोंढवा, पुणे) , ३) समर्थ बाबासाहेब माडळकर (वय १९, रा. काकडे वस्ती, कोंढवा, पुणे), ४) समर्थ राजेंद्र दुधभाते (वय १७, रा. काकडे वस्ती, कोंढवा, पुणे) अशी सांगितली. पळून गेलेल्या इसमाचे नाव आकाश संजय पवार रा. ब्रम्हतळे, भिंगार असे असल्याचे सांगितले. आरोपींच्या अंगझडतीत १ गावठी कट्टा, १ जिवंत काडतुस, कोयता, चाकू, मोबाईल असा १ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरुद्ध अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाण्यात गु.र.नं. 288/2025 भारतीय न्याय संहिता कलम 310(4), 310(5), सह आर्म अ‍ॅक्ट कलम 3/25, 4/25 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला आहे. गुन्ह्याच्या तपासात वरील ४ आरोपींना अटक करून न्यायालयाने त्यांची ३ दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली. तपासादरम्यान पळून गेलेला आकाश संजय पवार यालाही ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून १ लाख ५० हजार रुपये किमतीचे ३ गावठी कट्टे आणि ९ हजार रुपये किमतीची ९ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. या कारवाईमध्ये एकूण १ लाख ९० हजार रुपये किमतीचे ४ गावठी कट्टे, १० हजार रुपये किमतीची १० जिवंत काडतुसे, कोयता, चाकू, मोबाईल असा एकूण २ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अधिक तपास सुरू आहे.

# अहिल्यानगरसह “या” जिल्ह्यात पुढील चार दिवस पावसाचे

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

नैऋत्य मॉन्सूनने दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा प्रगती करत लक्षद्वीपपर्यंत मजल मारली असून पुढील काही दिवस मॉन्सूनच्या वाटचालीसाठी पोषक वातावरण निर्माण झाल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे. राज्यातील विविध भागांत पुढील पाच दिवस वादळी पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली असून विदर्भात काही जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशाराही देण्यात आला आहे.




हवामान विभागाच्या माहितीनुसार, मॉन्सूनने बुधवारी नैऋत्य व आग्नेय अरबी समुद्राचा काही भाग व्यापला. तसेच लक्षद्वीपच्या काही भागांपर्यंत मॉन्सून पोहोचला आहे. याशिवाय नैऋत्य व आग्नेय बंगालच्या उपसागराचा काही भाग, संपूर्ण अंदमान समुद्र आणि पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरातील काही भाग मॉन्सूनच्या प्रभावाखाली आले आहेत. पुढील दोन दिवसांत मॉन्सून नैऋत्य व आग्नेय अरबी समुद्राचा आणखी काही भाग, लक्षद्वीप परिसर, आग्नेय व मध्य-पूर्व बंगालच्या उपसागराचा काही भाग तसेच नैऋत्य बंगालच्या उपसागराचा संपूर्ण भाग व्यापण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. दरम्यान, राज्यात पुढील पाच दिवस अनेक भागांत पावसासाठी पोषक वातावरण राहणार आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, नांदेड आणि लातूर जिल्ह्यांत पुढील पाच दिवस पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जालना, धाराशिव आणि बीड जिल्ह्यांत पुढील दोन दिवस ढगाळ वातावरणासह हलक्या पावसाची शक्यता आहे.

# एर्ड कंपनीतील १६० कामगारांचा विविध मागण्यांसाठी बेमुदत संपावर

इगतपुरी : (स. गांवकरी)

इगतपुरी तालुक्यातील गोंदे औद्योगिक वसाहतीतील रोथे एर्ड कंपनीतील १६० कामगारांनी विविध मागण्यांसाठी २१ मे पासून बेमुदत संपावर गेले असून आठ दिवस झाले तरी या कामगारांची कोणी दखल घेतलेली नाही. इगतपुरी तालुक्यातील गोंदे औद्योगिक वसाहतीमध्ये कामगारांच्या प्रश्नांमुळे पुन्हा एकदा अशांततेचे वारे वाहू लागले असून रोथे एर्ड कंपनीतील सुमारे १६० कामगारांनी आपल्या विविध मागण्यांसाठी सिटूचे देविदास आडोळे यांच्या नेतृत्वाखाली बेमुदत संप पुकारत कंपनीच्या गेटबाहेर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. रोथे एर्ड कंपनीत गेल्या ३ ते १० वर्षांपासून कार्यरत





असलेल्या कामगारांनी कायम नोकरी, वेतनवाढ तसेच कामगार कायद्यांनुसार हक्क मिळावेत या प्रमुख मागण्यांसाठी सिटू कामगार संघटनेची स्थापना केली. नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक भूसंपादन इगतपुरी तालुक्यात विविध प्रकल्पांसाठी झाले आहे. धरणे, लष्कर, लोहमार्ग, महामार्ग, समृद्धी महामार्ग तसेच औद्योगिक वसाहतींसाठी मोठ्या प्रमाणावर जमीन संपादित करण्यात आली असून आजही भूसंपादनाची प्रक्रिया सुरूच आहे. न्याय हक्कासाठी २९ मे रोजी या कामगारांनी कुटुंबासह जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा आयोजित करण्यात आला आहे.

असे असतानाही स्थानिक युवकांना अपेक्षित रोजगार मिळत नसल्याने बेरोजगारीचे प्रमाण वाढत असल्याची भावना व्यक्त होत आहे. अनेक कंपन्यांमध्ये कामगारांना ठेकेदारी पद्धतीने अत्यल्प वेतनावर काम करावे लागत असून शासन व लोकप्रतिनिधींनी बेरोजगार व कामगारांच्या प्रश्नांवर शासनदरबारी आवाज उठवून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी होत आहे. दरम्यान, रोथे एर्ड कंपनीतील कामगारांनी सिटूच्या नेतृत्वाखाली कामबंद आंदोलन सुरू केले असून या पार्श्वभूमीवर सीआयटीयू कामगार भवन येथे जनरल बॉडी मिटिंग पार पडली. या बैठकीस सिटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष कॉ. डॉ. डी. एल. कराड उपस्थित होते. त्यांनी कामगारांना संघटित राहण्याचे व हक्कांसाठी लढा देण्याचे मार्गदर्शन केले. सिटूचे जिल्हा सरचिटणीस कॉ. देविदास आडोळे यांनी कामगारांचे होणारे शोषण व पिळवणुकी विरोधात एकजुटीने संघर्ष केल्यासच न्याय मिळू शकतो, असे सांगितले. युनियनचे जनरल सेक्रेटरी कॉ. तुकाराम सोनजे यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून कामगारांनी कमी वेतनात काम करून कंपनीला सहकार्य केले. मात्र, कामगार कायद्यांनुसार लाभ देण्याऐवजी कंपनी व्यवस्थापनाने संघटना स्थापन करणाऱ्या व युनियनसाठी पुढाकार घेणाऱ्या सुमारे ३० कामगारांना कोणतेही कारण न देता कामावरून कमी केले आहे. या कामगारांना न्याय मिळत नसल्याने त्यांनी दि. २९ मे रोजी कुटुंबासह जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे

### प्रारब्ध कथासंग्रहाचे प्रकाशन



अहिल्यानगर (स. गांवकरी) : "माणसांच्या सामाजिक व्यवहाराचे सखोल चिंतन करून विधी लिखित घटना आणि घडामोडींचा परामर्श प्रारब्ध या कथासंग्रहाच्या माध्यमातून घेतलेला दिसून येतो, भविष्यकाळात निश्चितच या लेखिकेकडून अधिक कसदार साहित्य निर्मिती होऊ शकेल, असे या पुस्तकावरून दिसून येत आहे.' असे मत न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी व्यक्त केले. शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित १७व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनामध्ये शिक्षिका, लेखिका सौ. एस. एम. मिर्झा यांच्या प्रारब्ध या कथासंग्रहाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी विचारपीठावर महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय कार्यवाह जयंत येलुलकर, माजी कुलगुरू डॉ. अशोकराव ढगे, संपादक प्रभाकर सूर्यवंशी, नवजीवन प्रतिष्ठानचे राजेंद्र पवार, शब्दगंध चे संस्थापक सुनील गोसावी व अध्यक्ष राजेंद्र उदागे आदि मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. सागडे म्हणाले की, हिंदी भाषिक असूनही सौ.मिर्झा यांनी उत्कृष्ट मराठी कथा लिहिलेल्या आहेत, मूळच्या शिक्षकी पेशातल्या सेवानिवृत्त शिक्षिका सध्या लेखिका म्हणून कार्यरत असताना आलेल्या विविध अनुभवांचा आलेख या कथासंग्रहामधून मांडत आहेत. समाजातील विविध प्रश्नांना त्यांनी कथेच्या माध्यमातून हात घातलेला असून या कथा निश्चितच प्रेरणादायी आहेत.

# अधिकमासात अंत:करणातील भावच श्रेष्ठ

## पु. निसळशास्त्री यांच्या विद्वत्तेचा वारसा लाभलेल्या पणतीकडून अभ्यासपूर्ण निरूपण



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अधिकमास खऱ्या अर्थाने सफल करावयाचा असेल, तर अंतःकरणातील निर्मळ भाव, श्रद्धा आणि नामस्मरण यालाच सर्वाधिक महत्त्व आहे, असा प्रभावी संदेश ह.भ.प. कु. रेणुका सिध्देश्वर निसळ यांनी आपल्या नारदीय कीर्तन सेवेतून दिला. सनातन धर्म सभेत आयोजित या कीर्तन कार्यक्रमात संत साहित्य, नाममहिमा, संतांचे श्रेष्ठत्व आणि नारदीय कीर्तन परंपरेचे जतन या विषयांचे अत्यंत अभ्यासपूर्ण आणि रसाळ निरूपण करण्यात आले. विद्वान कीर्तनाचार्य पु. निसळशास्त्री यांच्या पणतीने सादर केलेल्या या सेवेमुळे कार्यक्रमाला विशेष आध्यात्मिक आणि वैचारिक उंची लाभली. कीर्तनाच्या पूर्वार्धात संत एकनाथ महाराज यांच्या "शांती ब्रह्म..." या अभंगाच्या माध्यमातून भक्तीतील भावाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. अधिकमास हा केवळ धार्मिक विधी, उपवास किंवा कर्मकांड यापुरता मर्यादित नसून अंतःकरणातील श्रद्धा, ईश्वरनिष्ठा आणि नामस्मरण यांमुळेच तो सफल ठरतो, असे निरूपण करण्यात आले. भक्ती करताना बाह्य दिखाऊपणापेक्षा अंतःकरणातील शुद्ध भाव अधिक महत्त्वाचा असल्याचे उदाहरणांसह स्पष्ट करण्यात आले. उत्तरार्धात संत तुकाराम महाराज यांच्या अभंगांद्वारे संतांचे महत्त्व, श्रेष्ठत्व आणि नामस्मरणाची ताकद यांचे प्रभावी विवेचन करण्यात आले. "तुकाराम तुकाराम म्हणता यम कापे" तसेच "गाथा पाचवा वेद" या उक्तींचा संदर्भ देत संतवाङ्मयाचे दैवी सामर्थ्य अधोरेखित करण्यात आले. संतांचे विचार हे समाजाला दिशा देणारे असून नामस्मरणामुळे जीवनात शांती, समाधान आणि आत्मिक आनंद प्राप्त होतो, असे चिंतनात्मक निरूपण करण्यात आले. कीर्तन सेवेला तबल्यावर हर्षद भावे यांनी तर हार्मोनियमवर कल्याण मुरकुटे यांनी सुरेल साथसंगत केली. त्यांच्या समर्थ साथसंगतीमुळे सेवेला अधिक उठाव प्राप्त झाला. सनातन धर्म सभेच्या वतीने ह.भ.प. कु. रेणुका सिध्देश्वर निसळ यांचा सन्मान पसायदान ची प्रतिमा देऊन करण्यात आला. निळकंठ देशमुख,उमेश नगरकर, उमेश वाळुंजकर, राजेंद्र नगरकर उपस्थित होते. यावेळी नीलकंठ देशमुख यांनी नारदीय कीर्तन परंपरेचे जतन करण्याची गरज अधोरेखित केली. हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या या सेवेमुळे संतविचार आणि भारतीय संस्कृतीचे जतन होत असल्याचे त्यांनी सांगितले.

सनातन धर्म सभेची ही परंपरा समाजासाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास उमेश नगरकर, उमेश वाळुंजकर, राजेंद्र नगरकर यांच्यासह अनेक मान्यवर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोन्ही सेवा सर्वार्थाने परिपूर्ण ठरल्याने उपस्थित श्रोत्यांना परमानंदाची अनुभूती मिळाली.

## शेतकऱ्यांनी डिएपी खतास पर्यायी खते वापरावीत

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

राज्यामध्ये मागील 3 वर्षात खरीप हंगामात 44 लाख मे.टन रासायनिक खतांचा वापर झाला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने युरिया, डीएपी, एमओपी (म्युरेट ऑफ पोटॅश), संयुक्त खते व एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) या खतांचा वापर केला जातो. महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे. राज्यामध्ये लवकरच पेरणीला सुरुवात होणार असून डिएपी खताची शेतक-यांकडून जास्त मागणी होणार आहे. डिएपी खता मध्ये 18 टक्के नत्र तर 46 टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत. राज्यामध्ये डीएपी खताचा पुरवठा अपेक्षेप्रमाणे होत नाही त्यामुळे पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी (Single Super Phosphate) या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-16 टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे. एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके-10:26:26, एनपीके-20:20:0:13, एनपीके-12:32:16, युरिया एसएसपी कॉम्पलेक्स व एनपीके-15:15:15 या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो.

## भगवी टोपी, भगवे उपरणं कामी आले; माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांचा भाजप प्रवेश निश्चित

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अहिल्यानगर मतदारसंघातील उमेदवारीसाठी भाजपकडून माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांचे नाव जवळपास निश्चित झाले असून तनपुरे यांचा ३० मे रोजी भाजप प्रवेश होणार आहे.



भाजप पक्ष पदाधिकारी तसेच तनपुरे समर्थकांकडून याला दुजोरा मिळाला आहे. प्राजक्त तनपुरे हे शरद पवार गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांचे भाचे आहेत. प्राजक्त तनपुरे हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे माजी आमदार आहेत. त्यांच्या भाजप प्रवेशाची गेल्या काही दिवसांपासून चर्चा होत आहे. परंतु आता ते भाजपकडून विधानपरिषदेची निवडणूक लढवणार असल्याचे तसेच त्यांचा भाजप प्रवेशाचा मुहूर्त ३० मे रोजी ठरल्याची माहिती मिळाली. यासंदर्भात प्राजक्त तनपुरे यांच्याशी वारंवार संपर्क केला असता त्यांचा दूरध्वनी बंद असल्याचे आढळले. प्राजक्ता तनपुरे हे जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील मातब्बर नेते माजी खासदार प्राजक्त तनपुरे यांचे चिरंजीव आहेत. त्यांच्या आई डॉ. उषा तनपुरे राहुरी पालिकेच्या नगराध्यक्ष होत्या.

नुकतीच विधानसभेच्या राहुरी मतदारसंघासाठी पोटनिवडणूक झाली. या पोटनिवडणुकी पूर्वीपासून प्राजक्त तनपुरे वेगळी भूमिका स्वीकारणार असल्याचे संकेत मिळत होते. त्यांनी भगवी टोपी, भगवे उपरणं असा वेष परिधान करत हे संकेत दिले होते. त्यानंतर पोटनिवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याशी झालेल्या संपर्कातून तनपुरे यांनी पोटनिवडणुकीत उमेदवारी न करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यांच्या या निर्णयामुळे भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांचा विजय सहजसाध्य झाला. मुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्षांच्या संपर्कातून तनपुरे यांना विधान परिषदेच्या उमेदवारीचा शब्द मिळाल्याची चर्चा होत होती. त्याचा प्रत्यय आता येऊ लागला आहे. प्राजक्त तनपुरे हे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे भाचे आहेत. जयंत पाटील यांच्याच भाजप प्रवेशाची चर्चा होत आहे. तनपुरे यांनी दोन दिवसांपासून त्यांच्या 'डीपी'वर जयंत पाटील यांना भावनिक साद घालणारे छायाचित्र प्रदर्शित केले होते. त्यातूनही त्यांच्या पक्षप्रवेशाचे संकेत मिळत होते.

## नांदेड जिल्ह्यात खरीपसाठी मुबलक खत साठा उपलब्ध

नांदेड जिल्हा: (स. गांवकरी)

खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांच्या दृष्टीने खत ही सर्वात महत्त्वाची निविष्ठा असते. राज्य पातळीवर खताचे नियोजन कृषी आयुक्तालय, पुणे येथून होत असते. कृषी आयुक्तालयाकडून खरीप हंगामाच्या सुरवातीलाच जिल्ह्यासाठीचे खताचे आवंटन कळवले जाते. नांदेड जिल्ह्याला खरीप हंगामासाठी दरवर्षी सरासरी 2 लाख मेट्रिक टन खतांची आवश्यकता असते. खरीप हंगाम 2026 साठी नांदेड जिल्ह्याला सुमारे 2,11,500 मे.टन इतके खत आवंटन प्राप्त झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने 60,200 मे. टन युरिया, 32300 मे. टन डीएपी व 85300 मे. टन संयुक्त खते यांचा समावेश आहे. मागील वर्षीची शिल्लक व यावर्षी 1 एप्रिल पासून आजतागायत झालेला पुरवठा याचा अभ्यास केल्यास बाजारात 31,098 मे. टन युरिया होता.

**AGASTI SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD,**

A/p.Agastinagar, Tal-Akole, Dist-Ahmednagar, Pin-422601 (M.S)
(02424) 222714, 222775, Gram- Agastisakhar Akole
E-Mail- agastisakhar@rediffmail.com, agastipurchase@gmail.com
Ref.No:-Agasti/38/Purchase/85/2026-27 Date- 28/05/2026

**PURCHASE TENDER NOTICE - 2026-27**

Sealed tenders are invited from reputed manufactures, Authorized Dealers for the supply of material & who are registered in the Commissioner of Sugar office, Pune & National Federation of Co.Op. Sugar Factories, New Delhi. Tender/ Enquiry forms are available at karkhana site during office hours.

**A) Group- Supply of Material. (Eng.)-** 1) Consumable Material 2) L&T/Essan make Welding rods & Material 3) Chain & Chain spares 4) Iron & steel 5)Rubber Goods 6) C/F machine Spares 7) Pump Spares 8) Instrumentation Spares 9) Hardware 10) Pipe & Pipe fittings 11) All Type Valve 12) Mill Spares 13) Paints 14)Oil & Lubricants 15) Turbine Spares 16) Bearing (SKF) 17) Cleaning equipment 18) Electrical Material 19) Cane un loader Spares 20) S.S./M.S. Tube 21) Coupling 22) Boiler Chemicals 23) Work Shop tools 24) G.M. Bush & Bar & Bearing Liner 25)Gear Box Spares 26) Air Compressor Spares (I.R.) 27) Rubber V Belt,28) Hopper/Sugar Grader Spares, 29) Chain Pulley Block & Lifting Material 30) R.V.F Spares 31) Gauge Glass 32) Bailer Twine 33) Refectory Material 34) D.M. Plant spares & Chemical 35) D.G. Spares 36) Jointing Packing (Champion) Material. 37) Cooling Towers, 38) Plannetory Gear box & spares, 39) Ultrasonic flow meter,40) Centrifugal machine basket, 41) APFC panel, 42) Rotary vaccume filler screens & spares, 43) Supply of NK-1100 NHEC m/c spares.44)Supply of oxygen & Acetylene Gas,45)Bach type C/F M/C Spare Thysselcrup 1250

**B) Group- Supply of Material (MFG)-** 1)Brass Screen 2)Process chemicals 3)P.P. Bags 4)Sulphur 5)Lime 6) Nickel screen.7) S.S wire netting,8)Rubber Hose 9) ETP culture 10) Molasses preservative 11)Mass Flow meter For Molasses,12)Automatic Digital Polarimeter,13)Magnetic Flow Meter for ETP, .

**C) Group- Supply of Material. (Agri.)-** 1) Nylon Wire rope 2) Cane Harvesting knives 3)Bamboo 4) H.D.P.E. Tent 5)Tyre & Tubes (Bullock Cart) 6)Weigh Bridge –capacity modification.7) ADV Spares 9:16,8:19,1000:20

**D) Group- Annual Servicing Overhauling, Maintenance & recomissioning of job.**

Weigh bridges 2) D.G. Set 3) ) Mill Hydraulic System 4) Pressure Vessel Testing under factory act. 5) D.M. Plant servicing 6) Air Compressor 7)Mill Oil lubricator 8) All P.R.D. System AMC 9) Motor Rewinding 10) R.V.F. Servicing 11)U.P.S./D.P. Testing 12) Boiler FW Pump 13)Boiler Instrumentation & control System 14) Dynamic Balancing, 15) Power & Mill turbine 16) AVR & alternator servicing 17) Balancing of C/F m/c basket NK 1100 18)Overhauling of krupp 1250 cent.M/c-1 no 19)Gun metal recasting 20)Central line lubrication system of mill roller bearing 22) Overhauling of premium make planetary Gear boxes Model P2 BH-33SPL 23)AMC of Schneider Electric make VFD control panels repairing & maintenance of various drive 24)AMC for Repairing & maintenance of FORMOPLASTIC make AC-VFD. panels for Thyssenkrupp make batch type C/F machine KB-1250, 25)calibration various Flow meter, , 26) Sugar, ETP. Revamping & Up gradation with Designe, Drawing, 27)Online Monitoring System Data connectivity & AM, 28)Ultrasonic testing & thickness,29)Cane Tippler testing & HYD System,29)Air Condition Sevircing & Overhauling Sugar Distillery 30) Distillery Evaporatin PLC AMC For Manufacturer 31) Distillery plant All UPS,Invorter AMC.

**E) Group- Various/Listed Job Work** 1) Boiler IBR & Refractory work 2)Insulation Work 3) Molasses Tank Plate Replacement Work & Cooling System For 3 Tank,4) Pan vapor pipes dismantle & erection. 5) C vertical crystallizer coil replacement, 6) B crystallizer - Ribbon type modification. 7) Fabrication work Labor job.8) Air Compressore & Air blower servicing & Overhauling,9) Servicing & Overhauling of All UPS,10) Sugar & ETP Sluldge removal & white Wash of 05 day,25day lagoon & leachate pit , 11) Roller reshelling,12) West scrubber 13) Pan Top & bottom Dismantling, Supply & Erection 14) Supply ,Installation & Trial Of Hopper Try For No.2, 15) U Shoppe Crysteliser Dismantling of with coils & erection of Ribbon type Modification, 16) Dismantling of NK 1100 C/F, Checking of buttons, structure, replacement & re erection of NK 1100 M/C Complete with trials-3 Nos, 17)Design, manufacture, Supply, erection & Trials of TRF Roller with scraper argument for mill No.2.

* **Terms & Conditions-** 1)The Tender form / Enquiry will be issued from 10th June 2026 in our karkhana site 2) Conditional / Incomplete tenders will not be considered 3) Tenders should be given with Xerox copies of GST Registration & Firm Registration with commissioner of Sugar, Pune. 4) last date of submission of Tender is 20th June 2026, 5)Tender form cost Rs-1000/- Cheque, Online RTGS will be accepted RTGS Details Bank Of Maharashtra A/C No.60465225293 IFSC No.MAHB0001641,6)You have to Pay Rs.100/-'C' class Membership fee, 7) Karkhana reserves the right to acoept or reject the tender without assigning any reason thereof.

**Managing Director Vice Chairman Chairman**

## गुन्ह्यात मदतीसाठी २ लाख मागितले, १ लाखावर तडजोड

### नगर तालुक्यातील PSI गांगुर्डेविरुद्ध ACB चा गुन्हा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी एक लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक जयेश मोतीलाल गांगुर्डे याच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तोफखाना पोलीस ठाण्यात बुधवारी गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने नाशिक येथून गांगुर्डे याला ताब्यात घेतले असल्याचे उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांनी सांगितले. ACB चे पोलीस निरीक्षक राजू आल्हाट यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. उपनिरीक्षक गांगुर्डे हा तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत होता. त्याने एका गुन्ह्यात मदत करण्यासाठी सुरुवातीला दोन लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. त्यानंतर तडजोडीनंतर एक लाख रुपयांवर व्यवहार निश्चित करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले. तक्रारदाराने गेल्या १८ मे २०२६ रोजी ACB कडे तक्रार नोंदवली होती. तक्रारदाराच्या मामासह १५ जणांविरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा तपास गांगुर्डे याच्याकडे होता. संबंधित गुन्ह्यात मदत करण्यासाठी आणि आरोपींना सहकार्य करण्याच्या मोबदल्यात गांगुर्डे याने दोन लाख रुपयांची मागणी केली होती.

तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी थेट ACB कडे धाव घेतली. यानंतर पंचांसमक्ष पोलीस मुख्यालयाच्या गेटवर पडताळणी कारवाई केली असता संबंधित गुन्ह्यात मदत करण्यासाठी गांगुर्डे याने तक्रारदाराकडे एक लाख रुपयांची लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी बुधवारी गुन्हा नोंद करून गांगुर्डे याला ताब्यात घेतले.

गेल्या आठ दिवसांपूर्वीच उपनिरीक्षक गांगुर्डे याची सहायक निरीक्षकपदी पदोन्नती झाली होती. त्याची बदली नाशिक येथे झाली आहे. मात्र पदोन्नतीनंतर त्याला कार्यमुक्त करण्यात आले नव्हते. पोलीस मुख्यालयात सुरू असलेल्या प्रशिक्षणासाठी त्याला पाठवण्यात आले होते. तेथेच त्याने तक्रारदाराकडे लाच मागितली. दरम्यान, त्याला मंगळवारी तालुका पोलीस ठाण्यातून कार्यमुक्त करण्यात आले आणि बुधवारी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जिल्हा रुग्णालयात जागतिक मासिक पाळी स्वछता दिवस साजरा

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालय नांदेड येथे आज "जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवस" "Together for a Period Friendly india" या घोषवाक्याने साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एस.एम पेरके, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अवसरे, निवासी वैद्यकीय अधिकारी (बा.से) डॉ. आर.एस. बुट्टे, तसेच बाह्यरुग्ण विभागाच्या मेट्रन श्रीमती सुनिता राठोड, OPD इंचार्ज नारवाड सिस्टर, सर्व इंचार्ज सिस्टर, स्टाफ व महिला उपस्थित होत्या.

धनश्री अर्जुनराव गुंडाळे राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम समुपदेशक तसेच आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट चा उजास उपक्रमाचे जिल्हा समन्वयक सुचित्रा भगत यांनी मासिक पाळी संदर्भात माहिती देऊन मासिक पाळी स्वछता दिवस का साजरा केला जातो, मासिक पाळी विषयी समाजात असलेले समज गैरसमज बद्दल मार्गदर्शन केले. मासिक पाळी म्हणजे काय ? तिचे व्यवस्थापन, सॅनेटरी पॅड चा उपयोग त्याची व्हीलेवाट या बद्दल माहिती देताना राष्ट्रीय मासिक पाळी कार्यक्रम सर्वेमध्ये असे निदर्शनास आले आहे की, सन २०१५-२०१६ मध्ये सॅनेटरी पॅड चा वापर ४१.८ टक्के होता तर यात वाढ होऊन सॅनेटरी पॅड वापर सन २०२०-२१ मध्ये ६४.१ टक्के इतकी वाढ झाली आहे म्हणजेच २२.३ टक्के नी वाढ झाली आहे.

तर या वरून असे लक्षात येते की मासिक पाळी बाबत जागरुकता वाढून साधनांचा वापर वाढला आहे. मासिक पाळी कप हा शोषक साहित्य म्हणून आरोग्य तसेच निसर्गाला पोषक म्हणूनही महिला व मुलींमध्ये मासिक पाळी कप वापरण्याचे प्रमाण वाढले आहे.

# नागरिकांनी अहंकार आणि वाईट सवयींचा त्याग करावा

### सपोनि प्रवीण संपांगे

खोडद : (स. गांवकरी)

आज देशभरात ईद उल अजहा अर्थात बकरी ईद उत्साहात साजरी होत आहे. या ईदचा उत्साह नारायणगाव मध्येही पहायला मिळाला. नारायणगाव येथील ईदगाह मैदान, सुन्नी जामे मस्जिद परिसरात नमाज पठणासाठी मुस्लिम बांधवांनी सकाळी गर्दी केली होती. नमाज पठणानंतर गळा भेट घेत बांधवांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.



यावेळी सपोनि प्रवीण संपांगे म्हणाले की, बकरी ईद निमित कुरबानी करत असताना नागरिकांनी अहंकार आणि वाईट सवयी यांचा त्याग करावा तसेच शासनाच्या नियमांचे पालन करून ईद साजरी करावी असे आवाहन करत मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

तर यावेळी सुन्नी मुस्लिम जमातचे अध्यक्ष एजाज आतार, विश्वस्त महेबुब काझी यांनी मुस्लिम बांधवांना प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करत सर्वांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच पोलीस बांधव आपले सुख दुःख विसरून समाजाच्या सुरक्षेसाठी सातत्याने काम करत आहे. तर ग्रामपंचायत नारायणगाव उपसरपंच बाबू पाटे यांचेही मोलाचे सहकार्य असल्याचे सांगत त्यांचे आभार मानत सन्मान यावेळी करण्यात आला. या निमित्ताने इदगाह मैदान येथे मौलाना मोहंमद सज्जाद रजा तर सुन्नी जामा मस्जिद येथे हाफिज शेहबाज रजा यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज अदा करण्यात आली. यावेळी त्यांनी मुस्लिम बांधवांना एकतेचा आणि एकात्मतेचा संदेश दिला.

यानिमित्ताने उपसरपंच बाबु पाटे, सुरज वाजगे, पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील, सहाय्यक पोलीस निरिक्षक प्रवीण संपांगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमशेखर शेटे, पोलीस उपनिरीक्षक जगदीश पाटील, गोपनीय विभागाचे दत्ता ढेंबरे यांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सुन्नी मुस्लिम जमातचे अध्यक्ष एजाज आतार, विश्वस्त महेबुब काझी, हाजी नुरमहंमद मनियार, गफूर तांबोळी, रशीद इनामदार, जलील अन्सारी, अलीसाबीर इनामदार, ग्रामपंचायत सदस्य जुबेर आतार, जुबेर शेख, रियाज मणियार, युवाशक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष अशफाक पटेल, यांसह सुन्नी मुस्लिम जमातचे पदाधिकारी व नमाज पठणासाठी आलेले मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ईदगाह परिसर, सुन्नी मुस्लिम जामे मस्जिद, शाही जामे मस्जिद परिसरात नारायणगाव पोलिसांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# कोळगाव सोसायटीच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## प्राचार्य शहाजी हिरडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त जाहीर गौरव

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)



कोळगाव सोसायटीच्या वतीने श्री कोळाईदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कोळगाव येथील इयत्ता दहावी, बारावी, एनएमएमएस व शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच विद्यालयाचे प्राचार्य शहाजी हिरडे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच व चेअरमन हेमंत नलगे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून आर. के. लगड उपस्थित होते. यावेळी बोलताना अध्यक्ष हेमंत नलगे यांनी सांगितले की, “कोळगावमधील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्तेमध्ये उल्लेखनीय प्रगती करत विद्यालयाचे नाव उंचावले आहे. विद्यार्थ्यांनी भविष्यात उपलब्ध होणाऱ्या करिअरच्या विविध संधींचा योग्य उपयोग करून गाव, पालक आणि विद्यालयाचे नाव उज्वल करावे.” प्रमुख पाहुणे आर. के. लगड यांनी प्राचार्य शहाजी हिरडे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, “हिरडे यांनी आपल्या कारकिर्दीत विद्यालयाला प्रगतीच्या उंच शिखरावर नेले. विविध स्पर्धा परीक्षा व शालेय परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशामागे प्राचार्य, शिक्षकवर्ग, सेवकवर्ग आणि पालकांचे मोठे योगदान आहे.” यावेळी सोसायटीचे सचिव सुनील काकडे यांची स्वाभिमानी सचिव संघटना श्रीगोंदा तालुका उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास माजी सरपंच व चेअरमन हेमंत नलगे, चेअरमन संजय नलगे, व्हाईस चेअरमन नवनाथ मोहारे, नितीन डुबल, मच्छिंद्र नलगे, सुभाष लगड, प्राचार्य शहाजी हिरडे, सुनील काकडे, अमोल भापकर, नंदू लगड, जालिंदर नलगे, नागेश लगड, अजय लगड, विजय नलगे, निलेश बारहाते, संकेत नलगे, ओंकार नलगे, सत्कारमूर्ती विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय नलगे व दादा निरफळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन सोसायटीचे चेअरमन संजय नलगे यांनी मानले.



अभिराज फाउंडेशन वाकड या दिव्यांग मुलांच्या शाळेत ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन पुणे या संस्थेतर्फे शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन संस्थेचे संचालक डॉ.योगेश सामनेकर, डॉ.सुनिता सामनेकर, संजय मुळे, भारती वाणी, सविता मॅडम उपस्थित होते. संस्थे तील विद्यार्थ्यां कडून वृक्ष भेट देऊन सन्मान करण्यात आला. नियोजन संस्थेचे विकास जगताप, योगेश आढाळे, ऋषिकेश मुसुडगे, विनायक जुनावणे यांनी केले. सूत्रसंचालन अंजना चिगरे यांनी केले. या वेळी संस्थेचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### सलग सातव्या वर्षी सेंद्रिय केशर आंब्याची साई चरणी देणगी!

शिरूर (स. गांवकरी) : शिरूर तालुक्यातील चव्हाणवाडी येथील प्रगतिशील शेतकरी रवी नारायण करगळ यांनी यंदाही सेंद्रिय पद्धतीने उत्पादित केलेला तब्बल ३,५०७ किलो केशर आंबा श्री साईबाबा संस्थान येथे साई चरणी अर्पण केला आहे. विशेष म्हणजे, सलग सातव्या वर्षी त्यांनी ही देणगी देत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले आहे. रवी करगळ हे गेल्या १५ वर्षांपासून केशर आंब्याची शेती करत असून त्यांच्या बागेत सुमारे १,२५० आंब्याची झाडे आहेत. सुरुवातीपासूनच त्यांनी संपूर्ण बागेत सेंद्रिय शेतीचा अवलंब केला आहे. गावरान गायीच्या शेणापासून तयार करण्यात येणारे सेंद्रिय खत, जीवामृत आणि नैसर्गिक शेती पद्धतींचा वापर करून ते दर्जेदार आंब्याचे उत्पादन घेत आहेत. सेंद्रिय शेतीमुळे उत्पादनाचा दर्जा टिकून राहण्यास मदत होत असून ग्राहकांनाही आरोग्यदायी फळे मिळत असल्याचे करगळ यांनी सांगितले. त्यांच्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे. श्री साईबाबा संस्थानला प्राप्त झालेल्या या आंब्यांपासून तयार करण्यात आलेल्या रसाचा समावेश संस्थानच्या प्रसादभोजन योजनेत करण्यात आला आहे. साईभक्तांना प्रसादाच्या स्वरूपात सेंद्रिय आंब्याचा आस्वाद मिळणार असल्याने या देणगीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

### परीक्षा नियंत्रण टेबल टॉप उपकरण वर केंद्र सरकारकडून पेटंट मंजूर



शिरूर (स. गांवकरी) : छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी रतन बी.राऊत फोस्टर डेव्हलपमेंट कॉलेज ऑफ एज्युकेशन सहाय्यक प्राध्यापक, डॉ. बेबी सिंग व सहकार्याने विकसित केलेले 'परीक्षा नियंत्रण टेबल टॉप उपकरण यांना भारत सरकारकडून पेटंट मिळाले आहे. मार्गदर्शक डॉ.किलचे यांनी केले. सहकार्य हा प्रकल्प डॉ.दांडगे, डॉ.सोनवणे, प्रा.अश्विनी जैवळ आणि डॉ.विपिन सिंग यांच्या सहकार्याने पूर्ण झाला. संशोधकांच्या मते, हे पेटंट शैक्षणिक व्यवस्थापनात उपयुक्त असलेल्या नवीन उपायांना प्रोत्साहन देईल.प्रा.डॉ.बेबी सिंग यांनी आत्तापर्यंत अनेक पुस्तके लिहिली असून अनेक पुरस्कारांनीही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. संस्थेचे अध्यक्ष द्वारकाभाऊ पाथ्रीकर, सचिव भाऊसाहेब राजाळे , प्राचार्य डॉ. सुनीता पेटकर यांनी त्यांचे कौतुक केले.

### नंदुरबार जिल्ह्यातील परिवर्धा येथील सुपुत्राची राज्यस्तरीय भरारी !




ठाणे:कल्याण (स. गांवकरी) : सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील परिवर्धा या छोट्याशा गावातील सर्वसामान्य कुटुंबातील सुपुत्र डॉ. मणिलाल रतिलाल शिंपी यांनी आपल्या अथक परिश्रम, सामाजिक बांधिलकी आणि रस्ता सुरक्षा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याच्या जोरावर राज्यस्तरीय मानाचा टप्पा गाठला आहे. राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान विभागीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) म्हणून त्यांच्यावर मुंबई व कोकण विभागाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली असून, ही नियुक्ती संपूर्ण सातपुड्यातील नंदुरबार जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरत आहे. महाराष्ट्र राज्याचे वरिष्ठ IPS अधिकारी व पोलिस महासंचालक आदरणीय श्री. सदानंद वसंत दाते यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. मुंबई-कोकण विभागाचे शिक्षण उपसंचालक आदरणीय राजेंद्र कंकाळ आणि नाशिक विभागीय शिक्षण उपसंचालक माननीय श्री. संजय राठोड यांच्या अधिकारांतर्गत ही जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच ठाणे शहर वाहतूक पोलीस उपआयुक्त आदरणीय श्री. पंकज शिरसाट यांच्या प्रेरणेने या अभियानाला अधिक गतिमान स्वरूप प्राप्त झाले आहे. विस्तृत विभागाची जबाबदारी डॉ. मनिलाल शिंपी यांच्याकडे मुंबई, ठाणे, संपूर्ण कोकण विभाग, रायगड, पालघर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि अहिल्यानगर या महत्त्वाच्या जिल्ह्यांचा समावेश असलेला विस्तृत विभाग सोपविण्यात आला आहे. रस्ता सुरक्षा जनजागृती, विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक शिस्त, हेल्मेट व सीटबेल्ट वापराबाबत जागरूकता, मोबाईल वापर टाळणे, अपघात प्रतिबंध आणि सुरक्षित वाहतुकीसाठी समाजप्रबोधन हे त्यांच्या कार्याचे प्रमुख केंद्रबिंदू राहणार आहेत. डॉ. मणिलाल रतिलाल शिंपी हे केवळ अधिकारी नसून एक प्रेरणादायी सामाजिक कार्यकर्ते म्हणूनही ओळखले जातात. ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत त्यांनी रस्ता सुरक्षा अभियान प्रभावीपणे राबवत युवक, विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागृती निर्माण केली आहे. त्यांच्या कार्यात सातत्य, प्रामाणिकपणा, शिस्त, नम्रता आणि समाजाप्रती असलेली निष्ठा स्पष्टपणे दिसून येते.

# वरखेडा-करभेळ-भाकुर्डे पुलाचा मृत्यूशी संघर्ष : प्रशासन मात्र निद्रावस्थेत

## “झोपेचे सोंग सोडा, अन्यथा पुलावरच आंदोलन” : के. के. गांगुर्डेंचा सज्जड इशारा

कनाशी : (स. गांवकरी)



वरखेडा ते करभेळ, भाकुर्डेसह दहा ते बारा गावांना जोडणाऱ्या या पुलाची दयनीय अवस्था झाली आहे. कुठे मोठ्या भेगा पडल्या आहेत, तर कुठे स्लॅबला तडे गेले आहेत. पुलाची अवस्था इतकी बिकट आहे की तो कधीही कोसळेल आणि मोठा अनर्थ घडेल, अशी भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

हा पूल शेतकऱ्यांचा शेतमाल, अवजड वाहने, शाळकरी मुलांच्या स्कूल बसेस अशा जवळपास १५ गावांच्या दळणवळणाचा कणा आहे. रोज शेकडो नागरिक जीव मुठीत धरून याच पुलावरून प्रवास करतात. पावसाळ्यात तर परिस्थिती आणखी गंभीर होते. तरीही बांधकाम विभागाने मात्र याकडे साफ दुर्लक्ष केले आहे. सध्या पुलाची स्थिती पाहता प्रशासनाचा कारभार पूर्णपणे रामभरोसे सुरू आहे. पुलाच्या स्लॅबमधील गंजलेले गज उघडे पडले आहेत. पिलर खचत आहेत. तरीही स्ट्रक्चरल ऑडिट नाही, दुरुस्ती नाही. निद्रावस्थेत असलेले प्रशासन एखाद्या जीवितहानीची वाट पाहत आहे का, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. शेकडो शाळकरी मुलांच्या, शेतकऱ्यांच्या जीवाशी हा खेळ सुरू आहे. प्रशासनाने वेळीच डोळे उघडावेत. नाहीतर उद्याची दुर्घटना आजच्या दुर्लक्षाची शिक्षा असेल. काँग्रेस तालुकाध्यक्ष के. के. गांगुर्डे यांनी पुलाची पाहणी करून प्रशासनावर आगपाखड केली. “झोपलेल्या बांधकाम विभागाने आता तरी या पुलाकडे लक्ष देण्याची गरज आहे. दोन वर्षांपासून निवेदने देऊनही प्रशासन जागे होत नाही. एखादी मोठी दुर्घटना घडण्याची वाट पाहताय का? तातडीने दुरुस्ती करा, अन्यथा काँग्रेसच्या वतीने याच पुलावर ठिय्या आंदोलन छेडले जाईल,” असा इशारा त्यांनी दिला.

# मराठी ZEE5वर ‘सुपर डुपर’चा डिजिटल प्रीमियर २९ मे रोजी

मुंबई : (स. गांवकरी)

दिग्दर्शक समीर आशा पाटील यांच्या खुसखुशीत विनोदी-नाट्यपट ‘सुपर डुपर’चा डिजिटल प्रीमियर आता मराठी ZEE5वर होणार आहे. चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाल्यानंतर हा चित्रपट २९ मे २०२६ रोजी डिजिटल माध्यमातून प्रदर्शित केला जाणार आहे. ९९ प्रॉडक्शन्स आणि सिद्धिविनायक प्रॉडक्शन्स यांनी झी स्टुडिओजच्या सहकार्याने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटात अभिनेता ललित प्रभाकर, विदुला चौगुले, निर्मिती सावंत, हृषीकेश जोशी, शशांक शेंडे, कुशल बद्रिके आणि नम्रता संभेराव यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ‘सुपर डुपर’ची कथा मुंबईत स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी संघर्ष करणाऱ्या रोहित आणि ईशा या तरुण जोडप्याभोवती फिरते. त्यांनी खरेदी केलेला फ्लॅट चुकून




जाधव कुटुंबालाही विकला गेल्याचे समोर आल्यानंतर मोठा गोंधळ उडतो. न्यायालयाच्या आदेशानुसार दोन्ही कुटुंबांना एकाच घरात राहावे लागते आणि त्यातून विनोदी तसेच भावनिक प्रसंगांची मालिकाच सुरू होते. शहरी जीवनशैली आणि पारंपरिक मूल्यांतील संघर्ष, पिढ्यांमधील मतभेद, नात्यांमधील भावना आणि मुंबईतील घरांच्या समस्येवर हलक्याफुलक्या शैलीत भाष्य करणारी कथा हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य आहे.

# राहाता शहरात ईद-उल-अजहा अर्थात बकरी ईद उत्साहात



राहाता : (स. गांवकरी)

बकरी ईदनिमित्त शहरातील प्रमुख ईदगाह मैदानात विशेष नमाज अदा करण्यात आली. नमाजपूर्वी धर्मगुरूंनी ईद-उल-अजहाचे महत्त्व सांगत त्याग, समर्पण, मानवता आणि बंधुभावाचा संदेश दिला. नमाज पूर्ण झाल्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच देशात सुख-समृद्धी, शांतता आणि भाईचारा कायम राहावा यासाठी अल्लाहकडे विशेष प्रार्थना करण्यात आली. राहाता शहरात सणाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडूनही चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ईदगाह परिसरात वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे सण शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी धर्मगुरू मौलाना याहया कासमी, राहाता नगरपरिषद गटनेते हाजी मुन्नाभाई शाह, पत्रकार राजुभाई पठाण,सामाजिक कार्यकर्ते इलियास शाह, पत्रकार मुस्ताक शाह, पत्रकार जावेद सय्यद,मौलाना अल्ताफ, मौलाना रेहान, इलियासभाई शहा सर,मौलाना लतीफ, मौलाना कमरुद्दिन, मुफ्ती अब्दुल रहीम, हाफिज अकील, जमील शहा,हाफिज शकील, मौलाना मसूद, मौलाना अजिम, मौलाना अरबाज, हाफिज मुकिम, मौलाना शोएब ,आतिकभाई शहा,खिजर शहा,मुनवर इनामदार,जमील इनामदार,शाहिद शेख़,सिराजभाई कालुभाई शेख़,बादशाहभाई पठाण,आसिफ़ पठाण,मतिन पठाण अंसारभाई शेख़,मोहसिन शेख़,अज़ीज़ शेख़ यांच्यासह मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# 40 हून अधिक चित्रपटांच्या भव्य प्रीमियर मॅरेथॉनची सुरूवात

मुंबई : (स. गांवकरी)




अब नजर नहीं हटेगी झी सिनेमा से, क्यूंकि यहां प्रीमियर्स होंगे आऊट ऑफ कंट्रोल! या उन्हाळ्याला ब्लॉकबस्टर उत्सवात बदलत झी सिनेमा वाहिनी 40 हून अधिक चित्रपटांच्या प्रीमियरची भव्य शृंखला घेऊन येत आहे. यात प्रेक्षकांना ॲक्शनचा जबरदस्त धमाका, रोमहर्षक कथा आणि अखंड ब्लॉकबस्टर मनोरंजनाचा अनुभव मिळणार आहे. एकामागोमाग एक नव्या प्रीमियर्ससह प्रेक्षकांना नॉन-स्टॉप मनोरंजनाची सफर पहिल्यापेक्षाही अधिक जोमाने अनुभवता येणार आहे.

प्रीमियर्सच्या या मालिकेची सुरुवात ‘अखंडा 2’ या चित्रपटाने होणार असून त्याचा प्रीमियर सोमवार, 1 जून रोजी रात्री 8 वाजता होईल. नंदामुरी बालकृष्ण यांची प्रमुख भूमिका आणि बोयापती श्रीनु यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला हा चित्रपट श्रद्धा आणि अध्यात्मावर आधारित असून, वाढत्या अंधाराविरुद्ध धर्माचे रक्षण करणाऱ्या दैवी शक्तीभोवती ही कथा फिरते. अभिनेता - दिग्दर्शक या ब्लॉकबस्टर जोडीला पुन्हा एकदा एकत्र आणत भक्ती, न्याय आणि भव्य ॲक्शन यांचा जबरदस्त संगम साधत हा चित्रपट कथेला अधिक प्रभावी बनवतो. यात पाहायला मिळतो. ‘अखंडा 2’ मध्ये लढाई केवळ भौतिक पातळीवर मर्यादित न राहता धर्माच्या संतुलनाला आव्हान देणाऱ्या अदृश्य शक्तींचाही सामना करते. सनातन धर्म आणि दैवी ऊर्जेचा प्रभाव असलेला हा चित्रपट प्रेक्षकांना एक वेगळ्याच आध्यात्मिक पातळीवरील दमदार सिनेमॅटिक अनुभव देतो.

या लाईन-अपमध्ये ‘दिल मदरासी’ या चित्रपटाचीही भर पडत असून त्याचा प्रीमियर बुधवार, 3 जून रोजी रात्री 8 वाजता होणार आहे. ‘गजनी’ आणि ‘हॉलिडे’सारखे ब्लॉकबस्टर चित्रपट देणारे दिग्दर्शक ए. आर. मुरुगादोस यांचा हा चित्रपट असून, प्रभावी कथा आणि दमदार ॲक्शन सादर करण्यासाठी ते ओळखले जातात. ‘दिल मदरासी’ हा ॲक्शन आणि भावना यांचा उत्कृष्ट मेळ असलेला चित्रपट आहे. यात शिवकार्तिकेयन, रुक्मिणी वसंत आणि विद्युत जामवाल यांच्या प्रमुख भूमिका आहेत. शिवकार्तिकेयन एका संघर्षात अडकलेल्या व्यक्तीची भूमिका साकारत आहे, तर विद्युत जामवाल खलनायकाच्या भूमिकेत अत्यंत प्रभावी आणि धडकी भरवणाऱ्या उपस्थितीसोबत झळकतो. प्रीमियर्सची ही भन्नाट मालिका ‘किश्किंधापुरी’ या चित्रपटासह पुढे सुरू राहणार आहे. याचा प्रीमियर शुक्रवार, 5 जून रोजी रात्री 8 वाजता होणार आहे. ‘जय जानकी नायक’, ‘खूंखार’ आणि ‘प्रलय द डिस्ट्रॉयर’सारखे दमदार चित्रपट दिल्यानंतर साई श्रीनिवास बेल्लमकोंडा हे ह्या रहस्यमय थ्रिलरमधून एका नवीन भूमिकेत प्रेक्षकांसमोर येत आहेत. कौशिक पेगल्लापती दिग्दर्शित या चित्रपटात राघव आणि मैथिली यांची कथा दाखवली आहे. ते एका गूढ रेडिओ स्टेशनशी जोडलेल्या, भूतकाळातील काळ्या आणि हिंसक घटनांनी ग्रासलेल्या जगात अडकतात, जिथून सुटका करणे अशक्य वाटते. जसजसे गूढ अधिक गडद होत जाते, तसतसे ते एका भीषण स्वप्नात अडकतात... कारण काही दारे एकदा उघडली की ती पुन्हा कधीच बंद होत नाहीत.

ही तर फक्त ह्या सीझनची सुरुवात आहे. या मालिकेत पुढे ‘मास जतारा’, ‘ओडेला 2’, ‘भैरवम’, ‘अर्जुन S/O वैजयंती’, ‘शीलावती (दि घाटी क्वीन)’, ‘मावीरन’ आणि असेच अनेक रोमांचक प्रीमियर दर आठवड्याला ब्लॉकबस्टर मनोरंजनाच्या रूपात पाहायला मिळणार आहेत. झी सिनेमा वर एकदा प्रीमियर सुरू झाले की, चॅनेल बदलेगा नहीं! तेव्हा सज्ज व्हा प्रीमियर्सच्या ब्लॉकबस्टर सीझन, भव्य दिव्य कथा आणि अविस्मरणीय मनोरंजनासाठी फक्त झी सिनेमावर!

# नांदेड जिल्हा काँग्रेस पक्ष पदाधिकारी निवड तक्रारीचा चेंडु थेट दिल्ली दरबारी

## बालाजी चव्हाण व केदार पाटील यांची राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गेंना साकडे

नांदेड : (स. गांवकरी)



नांदेड जिल्ह्यामध्ये संघटन सृजन अभियानचा मोठा गाजावाजा करत राबविण्यात आले मात्र निवडी करत असताना केवळ खांदे पालटच करण्यात आल्याने जिल्ह्यात काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला कारण संघटन सृजन अभियानाचे प्रभारी हरकरा वेणुगोपाल यांनी दिलेल्या अहवालाला केराची टोपली दाखवत येथील लोक प्रतिनिधींनी आपले वजन दिल्ली दरबारी वापरून सर्वच निवडी करून घेतल्याने अहवालात शहर अध्यक्षासाठी आघाडीवर असलेले बालाजी चव्हाण व नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष पदासाठी केदार पाटील साळुंके यांना डावल्याने या दोघांनीही दिल्ली गाठत काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भेट घेऊन आपल्यावर निवड प्रक्रियेत अन्याय झाला असून न्याय देण्याची मागणी केली आहे. आता यावर काय निर्णय होतो हे पाहणे अच्छुक्याचे ठरणार आहे. काँग्रेसच्या नांदेड दक्षिण व उत्तर जिल्हाध्यक्षसह शहर अध्यक्ष निवडण्यासाठी जिल्ह्यात अखिल भारतीय काँग्रेस कडून संघटन सृजन अभियान राबवण्यात आले त्यातून फार मोठे संघटनात्मक बदल केले जातील आशी मोठी वल्गना करत पक्ष निरीक्षक तेलंगणाचे अनुभवी जेष्ठ नेते हरकरा वेणूगोपालराव यांनी जिल्ह्यात नऊ दिवस मुक्काम करून प्रत्येक विधानसभा क्षेत्रात जाऊन कार्यकर्त्यांची मते एकांतात जाणून घेतली व अहवाल तयार करत ही प्रक्रिया पारदर्शक असून यात लोकप्रतिनिधीसह कोणाचाच हस्तक्षेप चालणार नसल्याचा भरोसा दिला. त्यात निवडी होण्यासाठी इच्छुक असलेल्या अनेक नावाची चाचपणी करून त्यास प्राधान्यक्रम दिला. आणि आपला अहवाल अखिल भारतीय काँग्रेसकडे सुपूर्द केला त्यात नांदेड दक्षिण साठी खासदार राहुल गांधी यांच्या तीनही अभियानात काम केलेले संघटनेचा अनुभव व येथील पदाधिकाऱ्यांनी केलेल्या शिफारशी लक्षात घेता एक नंबरला केदार पाटील साळुंके यांचे नाव शिफारशीत गेलेले असताना खासदार रवींद्र चव्हाण यांनी या पदासाठी ईच्छुक आसल्याचे अर्ज देखील दाखल केलेले नसताना काँग्रेसमध्ये एक पद एक पदाधिकारी अशी संकल्पना असताना त्यांची निवड झाल्याने जिल्ह्यात पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला तर नांदेड शहर जिल्हाध्यक्ष पदासाठी अब्दुल सत्तार यांच्या जागी त्यांचाच मुलगा अब्दुल गफर यांची निवड करण्यात आली. त्यांनी महानगरपालिकेत विरोधी पक्ष नेते होण्यासाठी अशोक चव्हाण यांची भेट घेतल्याने त्यांना काँग्रेसच्या मोठ्या गटाने वरोध केलेला होता. त्यांचे नाव या अभियानात शेवटी असताना बालाजी चव्हाण यांचा संघटनात्मक कामाचा अनुभव लक्षात घेता पदाधिकाऱ्यांनी त्यांची केलेली शिफारस लक्षात घेता त्यांचे नाव एक नंबरला असताना त्यांनाही डावळण्यात आले व नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष पदासाठीही महिला किंवा ओबीसी देण्याचे अहवालात सुचवलेले असताना जिल्ह्याच्या नेत्यांनी येथे भाजपात अशोक चव्हाण सोबत जाऊन आलेले विठ्ठल पावडे यांची वर्णी लावल्याने नेत्यांना सर्वच कार्यकर्ते समान असताना अहवालानुसार निवड होऊ देण्याऐवजी त्यात मोठा हस्तक्षेप करत संघटन सृजन चा अहवाल केराच्या टोपलीत टाकत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,

# आनंदगड शैक्षणिक संकुल

## आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर



२५ गौरवमहोत्सवी वर्ष
वर्ष १९९९-२०२४

पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी **आनंदगड शैक्षणिक संकुल** येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!

(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)

DTE Code **5480**

## मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी

| | डी फार्मसी | बी फार्मसी |
|---|---|---|
| पात्रता | १२ वी पास (PCB / PCM) | १२ वी पास (PCB / PCM & CET) |
| कालावधी | २ वर्ष | ४ वर्ष |
| प्र.क्षमता | ६० विद्यार्थी | ६० विद्यार्थी |

विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!

- संपर्क -
7709203202
9421190696 I 9689758321

ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा

## धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडिअम स्कुल अँण्ड ज्युनिअर कॉलेज

**के जी ते १२ वी विज्ञान शाखा**
(इंग्रजी माध्यम)

अत्यल्प फी सर्वोत्कृष्ट शिक्षण



आपल्या पाल्याच्या शालेय प्रवेशासाठी संस्कारक्षम इंग्रजी माध्यमाची प्रयोगशील शाळा

- संपर्क -
9158077688
7875074070 I 9975276670

## आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज

पत्ता: आनंदगड शैक्षणिक संकुल, आनंदगड, वीरगांव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved

DTE Code **05662**

- सिव्हिल इंजिनिअरिंग 60
- मॅकॅनिकल इंजिनिअरिंग 60
- कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
- इलेक्ट्रिकल अँण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
- आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस अँण्ड मशीन लर्निंग 60

- संपर्क -
9209645837 I 9922545516
9765431168 I 7028724045 I 9922161686



महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व
औषधी द्रव्य विभाग महाराष्ट्र कौन्सिल ऑफ अॅक्युपंक्चर,मुंबई
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -

Anandgad Virgaon

## मातोश्री गंगुबाई शिंदे अॅक्यूपंक्चर कॉलेज अँण्ड हॉस्पिटल

**डिप्लोमा इन अॅक्युपंक्चर थेरपी (DAT)**

| | |
|---|---|
| प्रवेश क्षमता | ५० विद्यार्थी |
| डिप्लोमा कालावधी | २ वर्षे |
| शैक्षणिक पात्रता | इ. १२ वी पास |

सुविधा
- सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व अॅक्युपंक्चरिस्ट
- अॅक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
- वसतिगृह सुविधा उपलब्ध

- संपर्क -
9011271729
9834719663 I 7028724045

॥ सुजाता ॥ अकोले 9970095289

## थोडक्यात पण महत्वाचे



### आरोपींना अटक न झाल्याने आमरण उपोषणाचा इशारा

पारनेर (स. गांवकरी) : माजमपुर (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) : मौजे माजमपुर येथील कै. सुदाम विष्णु आढाव यांनी जमीनीच्या वादातून शेतात विषारी औषध प्राशन करून केलेल्या आत्महत्येप्रकरणी आरोपींना अद्याप अटक न झाल्याने त्यांचे पुत्र प्रभाकर सुदाम आढाव यांनी आमरण उपोषण करण्याची घोषणा केली आहे. प्रभाकर आढाव यांनी दिलेल्या निवेदनानुसार, गट नंबर ६२ मधील शेतीच्या वादात आरोपी संभाजी फक्कड आढाव, राजाराम फक्कड आढाव, शिवाजी फक्कड आढाव व भाऊसाहेब सोपान आढाव यांच्या सततच्या जाचाला कंटाळून कै. सुदाम विष्णु आढाव यांनी दि. २१ मे २०२६ रोजी शेतात विषारी औषध घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी पारनेर पोलिस स्टेशन येथे एफ.आय.आर. क्र. ३८७/२०२६ नोंदविण्यात आली आहे. मात्र, तब्बल आठ दिवस उलटूनही कोणत्याही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. प्रभाकर आढाव म्हणाले, “दि. ३१ मे २०२६ पर्यंत आरोपींना अटक झाली नाही तर दि. १ जून २०२६ पासून पारनेर पोलिस स्टेशन येथे मी व माझे कुटुंबीय आमरण उपोषणास बसणार आहोत.” उपोषणादरम्यान कुटुंबीयांच्या जीवितास धोका निर्माण झाल्यास संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. या संदर्भात पारनेर पोलिस निरीक्षक संतोष खेडकर यांना निवेदन देण्यात आले आहे. प्रभाकर आढाव यांनी पोलिस प्रशासनाकडे तातडीने आरोपींना अटक करण्याची मागणी केली आहे.

### ५ लाखाची मोटारीची केबल वायर चोरी; जुन्नर तालुक्यात शेतकरी भयभीत

शिवनेरी (स. गांवकरी) : पिंपळगाव जोगे धरण व कोळवाडी परिसरातील पाण्याचा साठा अल्प झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या विहीरतील मोटारीची तांब्याच्या केबल वायर पाच लाखाची चोरी झाल्यामुळे जुन्नर तालुक्यातील शेतकरी भयभीत झाला आहे. येथील केबल वायर चोरी प्रकरण सातत्याने होत असल्यामुळे आदिवासी शेतकरी संकटात सापडला आहे.याबाबत कोळवाडी येथील शेतकरी केरू धोंडीबा कुमकर, वय- ७७ वर्ष, यांनी याबाबत ओतुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली आहे. सकाळी ८ : ३० वा.च्या पूर्वी गावच्या हद्दीतील पिंपळगाव जोगा धरण बॅक कॉटरच्या कडेला असलेल्या पाण्याच्या मोटारीला जोडलेल्या ४ ,९५ ,५०० -/ रुपये किंमतीची ९ , ९ १० फुटी अपोलो कंपनीच्या तांब्याच्या तारा असलेली केबल वायर प्रत्येकी ५० रु फूट प्रमाणे अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. गावातील इतर शेतकऱ्यांच्या वरील वर्णनाच्या व किंमतीच्या तांब्याच्या तारा असलेली केबल वायर कोळवाडी व पिंपळगाव जोगा धरण परिसरात केबल वायर कोणीतरी अज्ञात चोरट्याने स्वतःच्या आर्थिक फायद्या करता मुद्दाम लबाडीच्या इराद्याने चोरी करून चोरून नेल्या आहेत. अज्ञात चोरट्याविरुद्ध पो. स्टे.येथे गु. र. नं . १४२ / २०२६ , बि एन एस २०२३ चे कलम ३०३ ( २), प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. उपविभागीय अधिकारी धनंजय पाटील व स पो निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पि एस आय जाधव करीत आहे.

### N.C.M.C कार्ड कॅम्प डिंगोरेत संपन्न

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : श्रीराम जेष्ठ नागरिक संघ डिंगोरे ता:- जुन्नर मार्फत.एस.टी. ची २३१ स्मार्ट कार्ड काढण्यात आली. संघाचे अध्यक्ष लक्ष्मण लोहोटे,संचालक दत्ता शिंगोटे मुरली उकिर्डे,खंडेराव आमले बाच्छासो खरात मारुती भिसे चंद्रकांत खरात,तुकाराम पडवळ,प्रभाकर शेरकर, हरिभाऊ उकिर्डे मान्यवराचे उपस्थितीत तालुका संघाचे प्रवक्ते शंकरराव भिसे गुरुजी आदी,आधार सुविधा केंद्र प्रमुख निलेश ज्ञानेश्वर नेहरकर यांचा श्रीराम जेष्ठ नागरिक संघामार्फत शाल श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.सर्व जेष्ठ नागरिक पुरुष व महिलांचे आभार मानण्यात आले.

### सचिन जाधव यांना शिवरत्न भूषण पुरस्कार



अलिबाग (स. गांवकरी) : व्यवसायाची गणिते सांभाळत असतानाच, समाजाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून अविरत समाजकार्य करणाऱ्या एका खऱ्या सुपुत्राचा गौरव नुकताच अलिबाग येथे करण्यात आला. 'टायगर ग्रुप'चे नाशिक जिल्हा उपाध्यक्ष मा. श्री. सचिन काशिनाथ जाधव यांना त्यांच्या उल्लेखनीय उद्योजकीय आणि सामाजिक कार्याची दखल घेऊन 'शिवरत्न भूषण पुरस्कार २०२६' या अत्यंत मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 'शिवप्रेमी सामाजिक संस्था, लोणारे, अलिबाग' च्या वतीने या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष रोहित राजेंद्र पाटील यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत दिनांक २७ मे २०२६ रोजी सचिन जाधव यांना हे 'सन्मानपत्र' देऊन जाहीरपणे गौरविण्यात आले. सचिन जाधव यांनी उद्योजक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा एक वेगळा ठसा उमटवला आहे. व्यावसायिक जबाबदाऱ्या अत्यंत चोखपणे पार पाडत असतानाच, त्यांनी 'टायगर ग्रुप'च्या माध्यमातून तळागाळातील लोकांपर्यंत मदत पोहोचवण्याचे मोठे काम केले आहे.

# पंधरा लाख रुपये किंमतीचे नऊ तोळ्याचे सोन्याचे दागिने केले परत

## राजेश वराळ यांचा प्रामाणिकपणा : चेअरमन गीतांजली शेळके यांनी केला वराळ यांचा सत्कार



पारनेर : (स. गांवकरी)

जी एस महानगर बँकेच्या शिरूर शाखेतील ग्राहक छाया बाळासाहेब शेळके यांचे बँकेत राहिलेले ९ तोळे सोन्याचे दागिने प्रामाणिकपणे परत केल्याबद्दल बँकेत कार्यरत असलेले राजेश रामचंद्र वराळ यांचा बँकेच्या चेअरमन गीतांजली शेळके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याबाबत अधिक माहिती अशी आहे की छाया बाळासाहेब शेळके या जी एस महानगर बँकेच्या शाखेत नेहमीप्रमाणे लॉकरची चौकशी करण्यासाठी आल्या होत्या. मात्र लॉकर ऑपरेट केल्यानंतर त्यांचे नऊ तोळ्याचे दागिने मात्र नकळत खाली पडले. त्या लॉकर बंद केल्यानंतर निघून गेल्या. त्यानंतर वराळ हे लॉकर रुममध्ये कामानिमित्त गेले असता हे दागीणे खाली पडले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. वराळ यांनी हे दागिने घेऊन तातडीने शाखाधिकारी बाबाजी लामखडे यांच्या लक्षात ही बाब आणून दिली. नुकत्याच छाया शेळके याच या लॉकर रुममध्ये गेल्याचे लामखडे साहेब यांच्या लक्षात आल्याने त्यांनी तातडीने शेळके यांना बँकेत पुन्हा बोलावून घेऊन लॉकरची पुन्हा तपासणी करण्याची सुचना केली यावेळी मात्र दागीणे नाहीत हे त्यांच्या लक्षात आल्याने लामखडे यांनी लगेच ते दागीणे त्यांना दाखवले याच वेळी बँकेच्या चेअरमन गीतांजली शेळके या शाखेला भेट देण्यासाठी येणार होत्या. त्या आल्यानंतर त्यांच्या हस्ते हे दागीणे छाया शेळके यांना देण्यात आले. चेअरमन गीतांजली शेळके यावेळी म्हणाल्या जी एस महानगर बँकेचे सर्वच अधिकारी व कर्मचारी अतिशय परिश्रम घेऊन प्रामाणिकपणे बँकेची सेवा करतात म्हणून बँकेचा नावलौकिक देशभरात झाला आहे. राज्यातील सर्वच शाखांमध्ये ठेवी, कर्जवाटप,वसुली यामध्ये जी एस महानगर बँकेचे नाव सहकार चळवळीत घेतले जाते याला सर्वस्वी कर्मचारी व अधिकारी यांचे योगदान मोठे असून शिरूर शाखेचा नावलौकिक पुणे जिल्ह्यात असून शाखाधिकारी बाबाजी लामखडे व राजेंद्र वराळ यांनी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम केल्याने या शाखेचा विकास मोठ्या प्रमाणात झाला असून वराळ यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करावे तेवढे थोडेच असल्याचे गौरवोद्गार शेळके ताई यांनी व्यक्त केले आहे. छायाताई शेळके यावेळी म्हणाल्या लॉकरची चौकशी करताना नकळत दागीणे खाली पडले हे लक्षातच आले नाही मात्र अतिशय प्रामाणिकपणे राजेश वराळ यांनी हे दागिने शाखाधिकारी लामखडे यांच्याकडे देत चेअरमन शेळके ताई यांच्या हस्ते सुपूर्द केले हाच प्रामाणिकपणा आम्हा ग्राहकांना आकर्षित करीत असून जी एस महानगर बँकेच्या कोनत्याही शाखेत गेले तरी तेथील सेवा व प्रामाणिकपणा ग्राहकांना आकर्षित करीत असल्याचे त्यांनी सांगत वराळ यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक केले. शाखाधिकारी बाबाजी लामखडे साहेब यावेळी म्हणाले गेली पंचवीस ते तीस वर्षे जी एस महानगर बँकेत काम करताना राजेश वराळ यांनी ग्राहकांना सेवा देताना प्रामाणिकपणे काम केले आहे. जी एस महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब व माजी चेअरमन उदयदादा शेळके साहेब यांनी दिलेली शिकवण, शिस्त व प्रामाणिकपणा आम्ही सर्वांनी जोपासला आहे. चेअरमन गीतांजली शेळके, उपाध्यक्ष भास्करराव कवाद व सर्व संचालक मंडळ यांच्या नेतृत्वाखाली काम करताना ग्राहक सेवा व बँक हिताचे निर्णय घेऊन जी एस महानगर बँकेचा नावलौकिक कसा वाढेल यासाठी आम्ही प्रयत्न केले असून वराळ यांचा प्रामाणिकपणा ही समाजातील गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. जी एस महानगर बँकेचे अधिकारी राजेश वराळ यांनी आदर्श जिवण जगताना ज्या बँकेने आपल्याला आयुष्यात मोठे केले आहे. त्या बँकेची सेवा करताना गेली पंचवीस ते तीस वर्षे सेवा देताना प्रामाणिकपणे काम करुन बँकेचा नावलौकिक वाढवला आहे. नऊ तोळ्याचे दागिने म्हणजे आजच्या बाजारभावाप्रमाणे साडेपंधरा लाखाचे दागिने परत देऊन जो प्रामाणिकपण दाखवला त्याबद्दल सोशल मिडिया माध्यमातून तसेच अनेकांनी वराळ यांचे अभिनंदन करीत कौतुक केले आहे.

# शक्ती प्रेसकडून विशेष समभाग विक्री उपक्रम

नागपूर : (स. गांवकरी)

मध्य भारतातील मुद्रण व आवरणनिर्मिती क्षेत्रातील प्रगत कंपनी शक्ती प्रेस लिमिटेडने विस्तार योजना आणि आर्थिक बळकटीसाठी ४९.२८ कोटी रुपयांचा समभागधारकांसाठी विशेष समभाग विक्री उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमासाठी अर्ज करण्याची मुदत २९ मे रोजी संपणार असून विद्यमान समभागधारकांना कंपनीतील आपला हिस्सा वाढविण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

या उपक्रमांतर्गत १० रुपये दर्शनी मूल्य असलेले २ कोटी ४६ लाख ४१ हजार ४०० पूर्णपणे भरलेले समभाग वितरित करण्यात येणार आहेत. प्रत्येक समभागधारकाला त्याच्याकडे असलेल्या एका समभागामागे सात नवीन समभाग घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे. प्रत्येक समभागाची किंमत २० रुपये निश्चित करण्यात आली आहे. या माध्यमातून उभारला जाणारा निधी कंपनीच्या विस्तार योजनांसाठी, उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी, कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी तसेच आर्थिक स्थिती अधिक सक्षम करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. याबाबत कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राघव कैलाशनाथ शर्मा यांनी सांगितले की, कंपनीच्या भावी वाढीसाठी हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

मुद्रण व आवरणनिर्मिती क्षेत्रातील दीर्घ अनुभव आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ग्राहकांना अधिक दर्जेदार सेवा देण्याचा कंपनीचा प्रयत्न असून या निधीमुळे उत्पादन क्षमता आणि कार्यक्षमतेत वाढ होईल. तसेच समभागधारकांसाठी दीर्घकालीन मूल्यनिर्मितीलाही चालना मिळेल. नागपूरस्थित शक्ती प्रेस लिमिटेडला या क्षेत्रातील सहा दशकांहून अधिकचा अनुभव आहे.

# मुरबाड येथे विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात

मुरबाड : (स. गांवकरी)

श्री राजे छत्रपती युवा प्रतिष्ठान, मुरबाड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला १० वी व १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा २७ मे रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक आणि मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ उद्योजक व समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे तसेच सुवर्णा ठाकरे उपस्थित होते. समाजसेवक नरेश म्हाडसे, गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि पालक यांचीही उल्लेखनीय उपस्थिती होती.



**समाजसेवक नानजीभाई ठक्कर यांची विशेष उपस्थिती!**

यावेळी नानजीभाई ठक्कर आणि डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नानजीभाई ठक्कर यांनी शिक्षणासोबत मेहनत, शिस्त आणि चांगले संस्कार यांचे महत्त्व अधोरेखित केले. यश हे केवळ विद्यार्थ्यांचे नसून त्यांच्या पालकांचे, शिक्षकांचे आणि समाजाचेही असल्याचे त्यांनी सांगितले. अपयशाने खचून न जाता ते यशाची पहिली पायरी मानून पुढे वाटचाल करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत कठोर परिश्रम, आत्मविश्वास आणि शिस्त यांच्या बळावर उज्ज्वल भविष्य घडविण्याचा संदेश दिला. तसेच अशा गुणगौरव सोहळ्यांमुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते आणि समाजात शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होते, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी समाजसेवक नरेश म्हाडसे यांनी नानजीभाई ठक्कर यांना सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय गौरव रथ यात्रा' महेश्वर मध्यप्रदेशकडे कूच करणार!

नाशिक : (स. गांवकरी)

"शौर्य, त्याग आणि लोककल्याणचा अभूतपूर्व त्रिवेणी संगम; ३० मे रोजी सकाळी 10 वाजता निमगाव देवपूर (नाशिक) येथून होणार ऐतिहासिक यात्रेचे प्रस्थान महेश्वर मध्यप्रदेश कडे होणार आहे. हिंदुस्थानच्या इतिहासात आपल्या अजोड पराक्रमाने, न्यायबुद्धीने आणि कुशल प्रशासनाने जनमानसावर अधिराज्य गाजवणाऱ्या पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी (३०० व्या) जयंती महोत्सवाचे औचित्य साधून 'छावा भारत क्रांती मिशन' च्या वतीने एक अत्यंत भव्य व ऐतिहासिक 'राष्ट्रीय गौरव रथ यात्रा' आयोजित करण्यात आली आहे. ही रथ यात्रा ३० ते ३१ मे २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे . निमगाव देवपूर (ता. सिन्नर, जि . नाशिक) येथून होणार आहे. नाशिकच्या पवित्र भूमीतून निघालेली ही ऐतिहासिक यात्रा पुढे मध्यप्रदेशातील होळकरशाहीची राजधानी असलेल्या नर्मदा तीरावरील महेश्वरकडे कूच करेल . या यात्रेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, महाराष्ट्राच्या मातीतील शौर्याचा आणि सुशासनाचा




वारसा सांगणारी दोन महान घराणी या यात्रेच्या उद्घाटनासाठी एकत्र येत आहेत. स्वराज्य जननी मासाहेब जिजाऊंचे वंशज श्रीमंत शिवाजीराजे जाधव आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज श्रीमंत भूषणसिंहराजे होळकर यांच्या शुभहस्ते आणि प्रमुख उपस्थितीत या 'राष्ट्रीय गौरव रथ यात्रेत' चैतन्य फुंकले जाईल. हा क्षण संपूर्ण महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानास्पद ठरणार आहे. शिवाजीराजे जाधव, कुंभमेळा राष्ट्रीय प्रवक्ता महंत भक्ती चरणदास महाराज, भाजप युवा नेते उदय भाऊ सांगळे, भाजपा प्रवक्ते पत्रकार अजित चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार जयंत महाजन, राष्ट्रीय अपंग अधिकारी कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष बाळासाहेब सोनवणे सर आदी सह विविध क्षेत्रातील मान्यवर देवपूर येथील कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. छावा भारत क्रांती मिशनचे संघटने राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर यांच्या नेतृत्वाखाली हया राष्ट्रीय गौरव रथ यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. धनगर समाजाचे सामजिक कार्यकर्ते ह्या जयंती समितीचे अध्यक्ष निवृती मुरडणर यांनी ह्या रथयात्रेचे आयोजन केले आहे. छावा भारत क्रांती मिशनचे मुख्य समन्वयक विजय काकडे पाटील, संघटक परमेश्वर नलावडे पाटील, धनगर समाजाचे वाल्मीक आप्पा कोळपे, बाबासाहेब चांगदेव कोळपे, छावा भारत क्रांती मिशन संघटनेचे मिडिया समन्वयक अमोल सोनवणे आदीच्या मार्गदर्शनाखाली यात्रेचे चोख नियोजन चोख करण्यात आले आहे. सह-आयोजक (मावळ्यांची फौज): मच्छिंद्र मुरडनर, विकास शेंडे, नवनाथ पोमणर, त्र्यंबक मुरडनर, अनिल मुरडनर, तुकाराम काळे, सागर मुरडनर, नारायण कांदळकर, अमोल ढेपले, योगेश मुरडनर, हरीश मुरडनर , ज्ञानेश्वर कोळपे, गोरख गोराणी , भाऊसाहेब शेंडे, शिवाजी हालवर, भास्कर शेंडे, सचिन कोळपे, आण्णा गेठे आदी सह-आयोजकांनी यात्रेच्या मार्गावरील स्वागत, निवास आणि सुरक्षेची जय्यत तयारी केली आहे. या यात्रेचा मुख्य उद्देश पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी विचारांचा जागर करणे, त्यांनी उभे केलेले जलव्यवस्थापन, कृषी सुधारणा आणि धार्मिक-सांस्कृतिक पुनरुत्थानाचा इतिहास आजच्या युवा पिढीपर्यंत पोहोचवणे हा आहे.

# फुडस्ट्रिट हबला सरकारची मंजुरी

बुलढाणा : (स. गांवकरी)

केंद्र सरकारच्या फुड स्ट्रिट योजनेअंतर्गत विदर्भातील शेगांव आणि मराठवाडा विभागातील शिर्डी येथे फुड स्ट्रिट हबला केंद्र सरकारच्या वतीने मान्यता देण्यात आली आहे. या योजने अंतर्गत दोन्हीही धार्मीक स्थळी प्रत्येकी 1 कोटी या प्रमाणे 2 कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकारच्या वतीन उपलब्ध करुन दिल्या जाणार आहे. या फुड स्ट्रिट हब सेंटर लोकांच्या सेवेसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. केंद्रिय आरोग्य मंत्रालय आणि भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने हि सेवा देशांतर्गत 100 ठिकाणी राबविण्यात येणार आहे. रस्त्यावरील खाद्यपदार्थामुळे होणारे आजार, अन्नातुन होणारी विषबाधा रोखण्यासाठी अन्न हाताळणीची सुरक्षीत मानके देशभर लागु करण्यात आली आहे. त्यानुसार केंद्रिय आरोग्य मंत्रालय आणि भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण यांच्या वतीने देशभरात 100 फुड स्ट्रिट योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत विदर्भाची पंढरी म्हणुन ओळख असलेल्या संत नगरी शेगांव येथे 1 कोटी रुपये खर्चुन आधुनिक स्वच्छ आणि “ आरोग्यदायी” स्वच्छ फुड स्ट्रिट विकसीत केल्या जाणार आहे. असेच फुड स्ट्रिट हब साई बाबा च्या शिर्डीतही उभारल्या जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने महाराष्ट्रातील दोन्ही धार्मीक स्थळांवर हे फुड स्ट्रिट हब विकसीत करण्याला मान्यता दिली आहे. त्यामुळे विदर्भाच्या पंढरीत येणाऱ्या संत गजानन महाराजांच्या भक्तांना तसेच साईबाबांच्या भक्तांना शिर्डीत दर्जेदार आणि पौष्टीक अन्न सेवा या हब च्या माध्यमातुन मिळणार आहे. शिवाय लघु व्यवसायीक विक्रेत्यांना रोजगाराची चालना मिळणार आहे. लाखो भाविकांचे श्रध्दा स्थान असलेल्या महाराष्ट्रातील शेगांव आणि शिर्डी येथे फुड स्ट्रिट हब मंजुर केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे केंद्रिय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात ३४ रुग्णांवर उपचार!

पुणे : (स. गांवकरी)




"समाज सेवा हीच आमची ओळख" या ब्रीदवाक्याला साजेसे कार्य करत श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, जय गणेश रुग्णसेवा अभियान, माय माऊली केअर सेंटर, समता फाउंडेशन मुंबई आणि एच. व्ही. देसाई हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने २७ मे २०२६ रोजी मोफत मोतीबिंदू व लेन्स शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरासाठी कात्रज, धनकवडी, पद्मावती, कोंढवा, खेड शिवापूर, राजगुरूनगर, हडपसर, बिबवेवाडी व पुणे परिसरातील एकूण ४० नागरिकांना माय माऊली केअर सेंटर, कात्रज येथून एच. व्ही. देसाई हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. त्यापैकी ३४ नागरिकांच्या मोतीबिंदू व लेन्स शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. उपचार पूर्ण झाल्यानंतर सर्व रुग्णांना सुरक्षितपणे त्यांच्या नातेवाईकांसमवेत घरी पाठविण्यात आले. या उपक्रमासाठी माय माऊली केअर सेंटरचे संस्थापक-अध्यक्ष विठ्ठलराव वरुडे पाटील, विशाल वरुडे पाटील आणि अश्विनी वरुडे पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. वृद्ध व अंथरुणाला खिळलेल्या आजी-आजोबांची सेवा करणारी माय माऊली केअर सेंटर संस्था आणि लायन्स क्लब ऑफ पुणे कात्रज यांच्या माध्यमातून सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. दरम्यान, २३ मे २०२६ रोजी नूतन मराठी विद्यालय, आप्पा बळवंत चौक, पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिरालाही नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. मोठ्या संख्येने नागरिकांनी विविध आरोग्य सेवांचा लाभ घेतला.

# मातंग समाज आक्रमक

राहुरी : (स. गांवकरी)

अनुसूचित जाती अ.ब.क.ड उपवर्गीकरण तात्काळ लागू करण्यात यावे, तसेच वंचित समाजघटकांना न्याय मिळावा, या प्रमुख मागण्यांसाठी मातंग समाज आक्रमक झाला असून राहुरी तहसील कार्यालयावर निवेदन देत शासनाचे लक्ष वेधले आहे. मातंग समाज एकीकरण समिती, राहुरी तालुका यांच्या वतीने तहसीलदार तथा दंडाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील अनुसूचित जाती प्रवर्गात 59 जातींचा समावेश असून 13 टक्के आरक्षणाची तरतूद आहे. मात्र मागील अनेक दशकांपासून या आरक्षणाचा बहुतांश लाभ काही मोजक्याच सशक्त जातींना मिळत



आहे. त्यामुळे मातंग, वाल्मिकी, गारुडी, डक्कलवार यांसारख्या वंचित जाती मुख्य प्रवाहापासून दूर राहत असून त्यांना शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अपेक्षित संधी मिळत नाहीत. मातंग समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या अन्यायग्रस्त समाज असून सन 1871 च्या गुन्हेगार जमाती कायद्यामुळे या समाजाचे मोठ्या प्रमाणात सामाजिक व आर्थिक शोषण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या समाजाला प्राधान्यक्रमाने स्वतंत्र न्याय मिळण्यासाठी अनुसूचित जाती अ.ब.क.ड उपवर्गीकरण तातडीने लागू करावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच सोशल मीडियावर वीर लहुजी वस्ताद साळवे तथा साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्याबद्दल आक्षेपार्ह व बदनामीकारक वक्तव्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली. जोपर्यंत अनुसूचित जाती उपवर्गीकरण लागू होत नाही, तोपर्यंत राज्य शासनाने कोणतीही मेगा भरती करू नये, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. यावेळी मातंग समाज एकीकरण समितीचे नाम साठे सर नगरसेवक सोन्याबापू जगधने सामाजिक कार्यकर्ते निलेश जगधने कांतीलाल जगधने, नंदू भाऊ शिंदे रवींद्र भाऊ शेलार ज्ञानेश्वर जगधने संतोष बोरुडे विजय बोरुडे रवी वैरागर सचिन घोरपडे विजय सरोदे सागर उंडारे नामदेव जगधने प्रशांत जगधने नितीन मोरे सोमा जगधने मुकेश जगधने सचिन शिंदे सचिन नन्नवरेकाकासाहेब आढागळे संदीप कोळसे आरणे सर विलास कोरडेसुनील बोरुडे श्याम नन्नवरे काळू ननवरेगणपत वायदंडे आधीसह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.